# महाराष्ट्र विधानसभा

**दुसरे अधिवेशन, २०२३**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**विदर्भ व मराठवाडयातील उद्योगांना देण्यात येणारी वीज सबसिडी बंद असल्याबाबत**

**(१) ३३७८६ (१२-०१-२०२२). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.समिर मेघे (हिंगणा), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वीज सबसिडीमुळे विदर्भ व मराठवाडयांतील सूक्ष्म व लघू उद्योजगांना उद्योजगांनी उद्योग सुरु केले परंतू वीज सबसिडी बंद केल्याने सदरील उद्योग संकटात आल्याचे माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदर्भ इंडस्ट्रीज असोसिएशनने सदरील वीज सबसिडी सुरु करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने उद्योगांना वीज सबसिडी देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) कोविड-१९ या जागतिक महामारीमुळे माहे मार्च २०२० पासून महावितरणच्या वसुलीवर त्याचा विपरीत परिणाम झाला. तसेच सन २०२० मध्ये आलेल्या निसर्ग चक्रीवादळ व सन २०२१ मधील तोक्ते चक्रीवादळामुळे महावितरणच्या प्रणालीचे मोठया प्रमाणात नुकसान झाले. त्यामुळे महावितरणची आर्थिक परिस्थिती अधिक बिकट झाली त्यामुळे माहे मे २०२१ च्या देयकापासून सदर सवलत तात्पुरती स्थगित करण्याचा निर्णय महावितरण कंपनीमार्फत घेण्यात आला.

तद्नंतर शासनाने जाहीर केलेल्या लॉकडाऊन संबंधीच्या निर्बंधामध्ये केलेल्या शिथिलीकरणामळे तसेच महावितरणच्या वसूलीमध्ये सुधारणा झाल्याने तसेच औद्योगिक संघटनांकडून मागणीच्या अनुषंगाने माहे मे २०२१ ची विदर्भ व मराठवाडा सवलत माहे ऑगस्ट २०२१ च्या वीज देयकात व तद्नंतर माहे जून २०२१ व जुलै २०२१ ची सवलत अनुक्रमे सप्टेंबर २०२१ व ऑक्टोबर २०२१ च्या वीज देयकात देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालाड, दिंडोशी येथील शिवशाही पुनर्वसन प्रकल्पातील इमारतीमधील रहिवाश्यांना नागरी सुविधा पुरविण्याबाबत**

**(२) ३८३७७ (२०-०४-२०२२). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील पश्चिम उपनगर मालाड (पू) दिंडोशी येथील सन २००२ मध्ये एस.आर.ए. प्राधिकरण व शिवशाही पुनर्वसन प्रकल्पांतर्गत बांधण्यात आलेल्या ३३ इमारतीमधील २६१४ रहिवाशी कुटुंबांना डांबरी रस्ता, पर्जन्य जलवाहिन्या, पाणी व ड्रेनेज पाईप लाईन आदि मुलभूत नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्याकरीता मा.गृहनिर्माण मंत्री यांच्या कार्यालयात दिनांक २५ ऑगस्ट, २०२१ रोजी झालेल्या बैठकीत एक महिन्यात संयुक्त पाहणी करुन प्रकल्प महापालिकेस हस्तांतरण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार एक महिन्यात पाहणी करुन सदरहू प्रकल्प सेवा, सुविधा व दुरुस्तीसाठी प्रोराटा चार्जेस शिवशाही कंपनीला कळविण्यात येऊन सदरहू प्रकल्प मुंबई महानगरपालिकेस विनाविलंब हस्तांतरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०६-२०२३) :** (१) होय.

तत्कालीन मा.मंत्री (गृहनिर्माण) यांच्याकडे दिनांक २५.०८.२०२१ रोजी झालेल्या बैठकीत प्रश्नांकीत इमारतींच्या येथील पायाभूत सुविधा बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या ताब्यात देण्यासाठी बृहन्मुंबई महानगर पालिका आणि शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितच्या अधिकाऱ्यांनी सदर प्रकल्पाची एक महिन्याच्या आत संयुक्तिक पाहणी करुन त्याचा अहवाल शासनास सादर करण्याचे निदेश देण्यात आले होते.

(२) बृहन्मुंबई महानगर पालिका आणि शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादितच्या अधिकाऱ्यांनी दिनांक २७.०९.२०२१ रोजी संयुक्तिक पाहणी केली. तसेच बृहन्मुंबई महानगर पालिकेने दिनांक १०.०५.२०२२ च्या पत्रान्वये सुधारीत प्रोराटा चार्जेस शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित यांना कळविले आहेत.

तथापि, प्रश्नाकिंत इमारतींच्या पुर्नबांधणीच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याचे निदेश तत्कालीन मंत्री महोदयांनी बैठकीत दिले असल्यामुळे शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित यांनी प्रोराटा चार्जेस बृहन्मुंबई महानगर पालिकेकडे भरलेले नाहीत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या मरोळ औद्योगिक क्षेत्रातील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबत

**(३) ४२१५४ (१२-०४-२०२२). :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या मरोळ औद्योगिक क्षेत्रातील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील ९९ निवासी सदनिकांमध्ये अनोळखी इसमाने बेकायदेशीर प्रवेश करुन ताब्यात घेतल्याची तक्रार उप अभियंता यांनी पोलीस ठाण्यात केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पोलीस ठाणे यांनी गुरक्र.७५/२०२० कलम ३४१, ४४८ भा.दं.वि. अन्वये गुन्ह्यांची नोंद केली असून सदर गुन्ह्याचा तपास करुन परिपूर्ण अहवाल महामंडळास प्राप्त होण्याकरिता महामंडळाने दिनांक ११ नोव्हेंबर, २०२०, ०४ एप्रिल, २०२१, १७ मे, २०२१, ०२ जून, २०२१ व दिनांक ०२ सप्टेंबर, २०२१ अन्वये पत्रव्यवहार करुन अहवाल सादर करण्याची विनंती केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कलमाच्या अनुषंगाने दिनांक १५ फेब्रुवारी, २०२१ रोजी पॉकेट क्र.५ इमारत क्र.१ व २ चे संयुक्त सर्वेक्षण करण्यात आले असून याप्रकरणी तपास करुन अहवाल महामंडळास प्राप्त झालेला नसून पॉकेट क्र.३ पुनर्वसीत इमारत क्र.५ चे संयुक्त सर्वेक्षण महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या पोलीस ठाण्याकडून अद्यापपर्यंत करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी वारंवार विनंती करुनही विकासकास व घुसखोरांस पाठीशी घालण्याकरिता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या पोलीस ठाणे कारवाई करीत नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, यासंदर्भात संबंधितांवर कारवाई होण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०३-२०२३) :** (१) व (२) होय हे खरे आहे.

(३) व (४) नाही, हे खरे नाही. सदर अर्ज प्रकरणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मरोळ औदयोगिक क्षेत्रातील महामंडळाच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील ९९ निवासी सदनिकांमध्ये अनोळखी इसमाने बेकायदेशीर प्रवेश करून ताब्यात घेतल्याबाबत उप अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अंधेरी, मुंबई यांचे फिर्यादी नुसार

एम.आय.डी.सी पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र.७५/२०२० नुसार भा.दं.वि. कलम ३४१, ४४८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी तपास करून विकासक हबटाऊन कंपनीचे संचालक यांच्याविरूध्द दि.२७/०५/२०२२ रोजी मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. तसेच वरील वस्तुस्थिती एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशनने दिनांक ०८/०९/२०२२ रोजी उप अभियंता व विशेष नियोजन प्राधिकरण, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मरोळ यांना कळविली आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती जिल्ह्यासह विदर्भातील पाटबंधारे प्रकल्पात बाधीत शेतकऱ्यांना महाराष्ट्र प्रकल्पग्रस्त पुनर्वसन अधिनियम २०१३ अन्वये न्यायोचित मोबदला मिळण्याबाबत

**(४) ४६५३९ (०९-१०-२०२२). श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यासह विदर्भातील पाटबंधारे प्रकल्पात बाधीत शेतकऱ्यांना महाराष्ट्र प्रकल्पग्रस्त पुनर्वसन अधिनियम २०१३ अन्वये न्यायोचित मोबदला मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (धामनगांव रेल्वे) यांनी सचिव, जलसंपदा विभाग यांना दिनांक २९.एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मागणीवर शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) दि.१६ मार्च,२०२२ व दि.२७.४.२०२२ रोजी तत्कालीन मा.जलसंपदा मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली होती. सन २००६ ते सन २०१३ या कालावधीत सरळ खरेदीद्वारे संपादित केलेल्या जमिनीची व मोबदल्याची माहिती पाचही महामंडळाकडून संकलित करावी, या विषयावरील स्थापित समितीच्या अहवालाचा आधार घेऊन एकत्रितरित्या प्रस्ताव आवश्यकतेनुसार महसूल, नियोजन व वित्त विभागास सादर करण्यात यावा. असा निर्णय सदर बैठकीत घेण्यात आला होता. त्यानुसार पाचही महामंडळांकडून प्राप्त झालेल्या माहितीमध्ये काही त्रुटी होत्या. त्याचा आढावा घेऊन सन २००६ ते २०१३ या कालावधीतील सरळखरेदीने संपादित केलेल्या जमिनींसाठी वाढीव मोबदला द्यावयाचा झाल्यास किती रकमेची आवश्यकता आहे, ही बाब जाणून घेण्याच्या अनुषंगाने आवश्यक माहिती सुधारित विवरणपत्रात दि.१७ जानेवारी,२०२३ च्या पत्रान्वये मागविण्यात आली आहे. सदर माहिती प्राप्त झाल्यानंतर व खर्चाचा एकूण आकडा लक्षात आल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी पुढील कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## केज (जि. बीड) मतदार संघात शेतीपंप धारकांसाठी थ्री-फेज ट्रान्सफार्मर बसविण्याबाबत

**(५) ४७६४२ (१६-०८-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केज (जि. बीड) मतदार संघातील गावात उदा. (केज विभागात- भाटुंबा, केकाणवाडी, धारूर विभागत- बोबडेवाडी) महावितरण कंपनीने गावठाणसाठी थ्री-फेज ट्रान्सफॉर्मर काढून सिंगलफेज ट्रान्सफॉर्मर बसविले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू काढून टाकलेल्या थ्री-फेज ट्रान्सफार्मरवर शेतीपंपाचे कनेक्शन होते त्यासाठीची पर्यायी व्यवस्था करणे आवश्यक असताना महावितरण कंपनीने कोणतीच व्यवस्था करुन दिली नसल्याने गावठाणचे शेतीपंप बंद असल्याने नागरीकांमध्ये मोठ्याप्रमाणे असंतोष निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केज मतदार संघात शेतीपंप धारकांसाठी ज्या गावात थ्री-फेज ट्रान्सफार्मर काढून सिंगलफेज ट्रान्सफार्मर बसवले आहेत त्याठिकाणी नवीन थ्री-फेज ट्रान्सफार्मर बसवण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी ऊर्जा मंत्री यांच्याकडे दिनांक १५ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने केज मतदार संघात शेतीपंप धारकांसाठी थ्री-फेज ट्रान्सफार्मर बसविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०६-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
सन २००५ ते २००८ च्या दरम्यान सिंगल फेजिंग योजना महावितरणने राबवली होती सदर योजनेत गावातील आकृषी ग्राहकांना २४ तास वीज पुरवठयासाठी गावठाण थ्री फेज रोहित्राच्या परिसरात सिंगल फेज रोहित्र बसविण्यात आलेले होते.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) केज (जि. बीड) मतदार संघातील गावात केज विभागात-भांटुबा, केकाणवाडी या ठिकाणी प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार नवीन थ्री फेज रोहित्र जिल्हा नियोजन योजने (DPDC) अंतर्गत मंजूर करण्यात आलेले आहेत, प्रशासकीय मान्यता दि.३१.०३.२०२३ नुसार प्राप्त झाली असून निविदा प्रक्रिया सुरु आहे. निधीची तरतूद झाल्यानंतर संबंधित कामाविषयी कार्यादेश निर्गमित करण्याचे नियोजित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्ह्यामध्ये अवैध पार्किंगचे प्रमाण वाढत असल्याबाबत**

**(६) ४७८११ (२८-१०-२०२२). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यामध्ये अवैध पार्किंगचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून पालघर शहर, तारापूर एमआयडीसी, डहाणू शहरात वाहतूक कोंडीचा मोठा प्रश्न निर्माण होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू अवैध पार्किंग व वाहतूक कोंडीबाबत वारंवार तक्रारी करुनही वाहतूक पोलिसांचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत तक्रारी प्राप्त होऊनही दुर्लक्ष करणाऱ्या वाहतूक पोलीसांची चौकशी करुन कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०६-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
अवैध पार्किंग व वाहतूक कोंडी करणाऱ्या वाहन चालकांवर नियमानुसार कारवाई करण्यात येत असून ऑक्टोबर, २०२२ पर्यंत भा.द.वि. कलम २८३ प्रमाणे एकूण २०२ केसेस व मोटार वाहन अधिनियम कलम १७७ अंतर्गत एकूण ०८ केसेस दाखल करण्यात आल्या आहेत.
(३) पालघर शहरातील वाहतूक कोंडीबाबतच्या तक्रारीकडे वाहतूक पोलीस दुर्लक्ष करीत असल्याबाबतचे आढळून आलेले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाटस (ता.दौंड,जि.पुणे) येथे नवीन पोलीस स्टेशन सुरु करण्याबाबत**

**(७) ४८५९० (३०-१०-२०२२). ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवत (ता.दौंड, जि.पुणे) येथील पोलीस ठाण्याचे विभाजन करुन पाटस या ठिकाणी नवीन पोलीस स्टेशन सुरु करण्याबाबत तसेच दौंड व यवत पोलीस स्टेशनच्या इमारती पुरेशा नसल्याने नवीन बांधकामासाठी निधी मिळण्याची मागणी लोकप्रतीनिधिंनी दिनांक २० ऑक्टोबर, २०१८ व २० जानेवारी, २०२० रोजी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांनीही पाटस या ठिकाणी नवीन पोलीस स्टेशन सुरु करण्याबाबत त्यांच्या क्र.पशा-१/पाटस पो.स्टे./१९१५३/२०१८, पुणे दिनांक २७.०९.२०१८ या पत्रान्वये शासनाकडे मागणी केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावाच्या मागणीनुसार पोलीस महासंचालक कार्यालयाने सादर केलेल्या महाराष्ट्र राज्य पोलीस दलाचा सुधारित आकृतीबंधामध्ये पाटस या ठिकाणी नवीन पोलीस स्टेशन निर्माण करण्याबाबतच्या प्रस्तावाचा समावेश करण्यात आला आहे, तसेच महाराष्ट्र राज्य पोलीस दलाचा सुधारित आकृतीबंध वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तत्कालीन गृह मंत्री यांनी दिनांक १३ ऑक्टोबर, २०२१ रोजी उप सचिव, गृह विभाग यांना याबाबत तपासून प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रस्तावास मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०२३) :**(१) होय.

(२) याबाबत पोलीस अधीक्षक, पुणे ग्रा. यानी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सादर केलेल्या प्रस्तावामध्ये काही त्रुटी असल्याने, त्याची पुर्तता करणेबाबत पोलीस अधीक्षक, पुणे ग्रा. यांना दि. ३०/११/२०२२ च्या पत्राव्दारे कळविण्यात आले आहे.

(३), (४) व (५) होय. महाराष्ट्र पोलीस दलाचा सुधारित आकृतीबंध प्रस्तावमधील एकूण ७० घटक कार्यालयाच्या प्रस्तावास उच्च स्तरीय सचिव समितीने अनुक्रमे दि. १३/१२/२०२२ व दि. ०६/०३/२०२३ व्दारे मान्यता दिली आहे. त्यानुसार शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भोर (जि.पुणे) पोलिस स्टेशन येथे मंजूर अधिकारी व कर्मचारी यांच्या संख्येची पूर्तता करण्याबाबत**

**(८) ४८९७७ (३०-१०-२०२२). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोर (जि.पुणे) पोलीस स्टेशन येथे मंजूर पदांपेक्षा अधिकारी व कर्मचारी वर्ग कमी असल्यामुळे उपस्थित कर्मचा-यांवर कामाचा जास्त ताण येत असून दीर्घ कालावधी लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू अधिकारी व कर्मचारी यांच्या मंजूर पदांच्या संख्याबळाची पूर्तता करण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पोलिस अधिक्षक (ग्रामीण), पुणे यांना दिनांक १९ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे,

कोव्हीड २०१९ या संसर्गजन्य आजारामुळे उद्धवलेल्या गंभीर परिस्थितीमुळे सन २०१९ पासून दिर्घ कालावधीपर्यंत पोलीस शिपाई भरती प्रक्रिया राबविण्यात आलेली नव्हती.

(२) होय, हे खरे आहे,
(३) सन २०१९ या कॅलेंडर वर्षातील रिक्त पदे भरण्यासाठी राज्यात पोलीस शिपाई पदाची एकूण ५२९७ पदांची भरती प्रक्रिया राबविण्यात आली होती. त्यापैकी पुणे ग्रामीण घटकामध्ये २१ पदे पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण करिता उपलब्ध करुन देण्यात आली. तसेच सन २०२० व २०२१ या कॅलेंडर वर्षातील रिक्त पदे भरण्याचे दृष्टीने राज्यात १८३३१ पदांची भरती प्रक्रिया राबविण्यात येत असून त्यापैकी पोलीस अधिक्षक, पुणे (ग्रा.) करिता पोलीस शिपाई अंमलदारांची ५७९ पदे व चालक पोलीस शिपाई अंमलदारांची ९० पदे अशी एकूण ६६९ रिक्त पदांची भरती प्रक्रीया सुरु करण्यात आलेली आहे. सदरहू भरतीव्दारे पोलीस शिपाई अंमलदार पदांचे मनुष्यबळ उपलब्ध होणार आहे. त्यामुळे सर्वसाधारण बदल्या तसेच पोलीस अंमलदारांची भरती प्रक्रिया पुर्ण झाल्यावर पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी/अंमलदारांची रिक्त पदे भरण्याबाबत नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आदिवासी विकास विभागामार्फत आदिवासी विद्यार्थ्यांना वस्तीगृहातच 'जुनी मेस पद्धत' सुरू करणेबाबत**

**(९) ४९६२५ (१८-०१-२०२३). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी विकास विभागामार्फत सुरू असलेली 'डीबीटी पद्धत' बंद करून आदिवासी विद्यार्थ्यांना वस्तीगृहातच भोजन व्यवस्था म्हणजे 'जुनी मेस पद्धत' सुरू करावी अशी मागणी अखिल महाराष्ट्र आदिवासी विद्यार्थी संघटनेने शासनाकडे केली असल्याचे माहे ऑगस्ट २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (०६-०७-२०२३) :**
(१) होय खरे आहे.
(२) वसतिगृह डिबीटी पध्दत कायम ठेवण्यात आलेली आहे.
(३) निरंक

---

**मेळघाटातील आदिवासींचे रोजगारासाठी शहराकडे स्थलांतर**

**(१०) ४९७०४ (२३-०१-२०२३). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.योगेश सागर (चारकोप), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विशेषत: मेळघाट, नंदुरबार, गडचिरोली, नाशिक या जिल्ह्यांतील बहुतांश आदिवासी नागरीक रोजगारासाठी वारंवार स्थलांतर करीत असल्याचे दिनांक २० ऑक्टोबर, २०२२ वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे स्थलांतरित कुटुंबातील मुलांच्या शिक्षणावर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अशा कुटुंबियांच्या पाल्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी गावातच रोजगार उपलब्ध होण्यासंदर्भात अथवा अन्य पर्यायांबाबत शासनाचे धोरण ठरविण्यात आले आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (०६-०७-२०२३) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
काही आदिवासी नागरीक रोजगारासाठी हंगामी स्वरूपात स्थलांतर करतात. शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र यांचे राज्यातील हंगामी स्थलांतरीत मुलांना शाळेच्या प्रवाहात आणण्यासाठी करण्यात आलेल्या सर्वेक्षणानुसार धारणी व चिखलदरा मधील एकूण २०३ स्थलांतरीत विद्यार्थी आढळून आले त्यापैकी एकूण १३३ स्थलांतरीत झालेल्या विद्यार्थ्यांना शिक्षण हमी कार्ड देण्यात आलेले असून त्यांना निवासी शासकीय किंवा अनुदानित आश्रमशाळांमध्ये प्रवेश दिलेला आहे. सबब, उक्त स्थलांतरीत कुटुंबातील मुलांच्या शिक्षणावर कुठलाही परिणाम झाल्याचे दिसुन आलेले नाही.
(३) अनुसूचित जमातीच्या नागरीकांना रोजगार उपलब्ध होणेकरीता तसेच अनुसूचित क्षेत्राचा विकास होणेकरीता शासनाच्या विविध विभागामार्फत विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लातूर महानगरपालिकेने प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत राबविलेल्या घरकूल योजनेबाबत**

**(११) ५०३५३ (२०-०१-२०२३). :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर महानगरपालिकेने प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत "ज्यांना शहरात जागा आहे परंतु घर नाही तसेच कच्चे घर आहे वा छताचे घर नाही" अशा नागरिकांकडून योजनेअंतर्गत घरासाठी अर्ज मागविण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने लातूर महानगरपालिका क्षेत्रात प्राप्त अर्जदारांपैकी १११० घरांना मंजुरी देऊन राज्य शासनाने योजनेच्या पहिल्या टप्प्यासाठी ११ कोटी १० लाख रुपये निधी उपलब्ध करुन दिला असल्याचे तर दुसऱ्या टप्प्यासाठी केंद्र शासनाकडून प्रत्येकी दीड लाख रुपये याप्रमाणे एकूण १७ कोटी १० लाख इतका निधी मिळणे अपेक्षित असल्याचे दिनांक २४ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या १११० घरांपैकी किती घरांची बांधकामे पुर्ण झाली आहेत व उर्वरित घरांबाबत सद्य:स्थिती काय आहे,
(४) तसेच केंद्र शासनाकडून दुसऱ्या टप्प्यासाठी अपेक्षित असलेला रुपये १७ कोटी १० लाखाचा निधी महानगरपालिकेस प्राप्त करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०७-२०२३) :** (१)होय.
(२), (३), (४) प्रधानमंत्री आवास योजनामध्ये (शहरी) घटक क्र. ४ (BLC) अंतर्गत लातूर महानगरपालिकेच्या हद्दीतील ९ प्रकल्पातील ७०१६ घरकुलांना केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीने मंजुरी दिलेली आहे. केंद्र शासनाचे रुपये ३८.३२ व राज्य शासन हिश्श्याचे रुपये ५८.७ कोटी असे एकूण रुपये ९७.०२ कोटी अनुदान लातुर महानगरपालिकेस वितरीत करण्यात आले आहे.

लातूर महानगरपालिका हद्दीत मंजूर झालेल्या एकूण ७०१६ घरकुलापैकी ३५२६ घरकुलांचे काम प्रगतीपथावर असून त्यापैकी १७९९ घरकुलांचे काम पूर्ण झाले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### निफाड तालुक्यातील निफाड पोलीस उपविभागीय कार्यालयास ५ पोलीस स्टेशन जोडण्याबाबत

**(१२) ५०८५८ (१७-०१-२०२३). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निफाड, (जि.नाशिक) येथील पोलीस उपविभागीय कार्यालय कार्यान्वित असून या उपविभागीय कार्यालयास निफाड तालुक्यातीलच ५ पोलीस स्टेशन जोडून स्वतंत्र उपविभाग करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे जुलै २०२० मध्ये वा त्या दरम्यान शासनाकडे केलेली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने तसा प्रस्ताव गृह विभागामार्फत तयार करण्यात आलेला आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०२३) :**(१) होय.

(२) नाही. उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, नाशिक ग्रा. यांचे अधिपत्याखालील ओझर व पिंपळगांव पोलीस ठाणे ही उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, निफाड विभाग यांना जोडल्यास उप विभागीय पोलीस अधिकारी, नाशि विभागामध्ये केवळ तीनच पोलीस ठाणे उरतील. उक्त बाब प्रशासकीयदृष्टया योग्य नसल्याने, पुनर्रचना करणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला नसल्याचे पोलीस महासंचालक कार्यालयाने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राष्ट्रीय महामार्गावरील खामगाव-अकोला रस्त्यावरील वाहनधारकांना वेग मर्यादा ताशी ८० असतांनाही पोलीस दंडात्मक कारवाई करीत असल्याबाबत

**(१३) ५१२२५ (१९-०१-२०२३). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय महामार्गावरील खामगाव-अकोला रस्त्यावरील बाळापूरनजिकच्या वाहतूक पोलिस चौकीतील पोलिस वाहनधारकांना वेग मर्यादा ताशी ८० असतांनाही दंडात्मक कारवाई करीत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) खामगाव अकोला महामार्गाचे रुंदीकरणाचे काम सुरू असून त्या ठिकाणी वेगमर्यादा ताशी ३० कि.मी. आहे. त्याबाबत ठिकठिकाणी वेगमर्यादेबाबतचे फलक लावण्यात आलेले असताना काही वाहन चालक ताशी ७० ते ८० कि.मी. वेगाने वाहन चालवून वेग मर्यादेचा भंग करतात. त्यामुळे अपघात होण्याची दाट शक्यता असते. यास्तव वेग मर्यादेचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर नियमितपणे दंडात्मक कारवाई करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील सर्व शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत

**(१४) ५१२४५ (१८-०१-२०२३). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत माहे, सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान बैठक घेऊन निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती पोलिस आयुक्तंतर्फे सर्व सीसीटीव्ही कॅमेरा बसविण्याबाबत प्रस्ताव यापूर्वी गृह विभागाकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रस्तावाबाबची सद्य:स्थिती काय आहे?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०६-२०२३) :**(१) अपर पोलीस महासंचालक (नि. व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दि.०२.०५.२०२२ च्या पत्रान्वये महाराष्ट्र राज्यातील विविध शहरांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्यासाठी शहरांचे प्राधान्यक्रम निश्चित करण्यासाठी सादर केलेल्या धोरणास दि.०७.०७.२०२२ रोजीच्या शासन पत्रान्वये मान्यता देण्यात आली आहे.
(२) सहायक पोलीस महानिरीक्षक (का. व सु.), पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई यांनी दि.३०.०९.२०२२ च्या पत्रासोबत पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांनी दि.२६.०९.२०२२ च्या पत्रान्वये सादर केलेला "अमरावती शहरात गुन्हेगारीवर अंकुश ठेवणेकरीता सीसीटीव्ही कॅमेरे लावणेबाबत" प्रस्ताव शासनास पाठवला आहे.
(३) सदर प्रकल्प DPDC निधीतून राबविण्यात येणार असून जिल्हाधिकारी, अमरावती यांचेकडून निधी प्राप्त करुन घेण्याबाबत व अमरावती शहर सीसीटीव्ही प्रकल्पाबाबत सविस्तर प्रकल्प अहवालासह (DPR) प्रस्ताव सादर करणेबाबत दिनांक ३०.११.२०२२ च्या शासन पत्रान्वये पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना कळविण्यात आले आहे.

---

**डोंबिवली मानपाडा पोलीस ठाण्याचे विभाजन करण्याबाबत**

**(१५) ५१३८२ (१८-०१-२०२३). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डोंबिवलीतील (जि.ठाणे) येथील सुमारे २५ वर्षांपूर्वी स्थापन झालेले मानपाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत एमआयडीसी फेज १ आणि २, निवासी विभागासह २४ गावाचा समावेश असून भोपर ते खिडकाळी, मलंगडपट्टी ते टाटा पॉवर, पिसवली ते जिमखाना, सागली -सागावापर्यंत असा तब्बल ६८ चौरस किमी क्षेत्रफळ असून या भागात कायदा व सुव्यवस्था सांभाळताना मानपाडा पोलिसांना अनेक गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत असल्याने सध्याच्या मानपाडा पोलीस ठाण्याचे विभाजन करून काटई व दावडी अशी आणखी दोन नवीन पोलीस ठाणे निर्माण करण्यात यावी म्हणून तेथील नागरिकांची मागील अनेक वर्षाची मागणी केली असून कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रतिनिधींनी तत्कालीन गृहमंत्री तसेच विद्यमान गृहमंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे दि. १६ जून २०२१ रोजी व दि. २२ ऑगस्ट २०२२ रोजी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मानपाडा पोलीस ठाण्यावर सध्या प्रचंड प्रमाणावर कामाचा ताण पडत असल्याने यापूर्वी सदरहू मानपाडा पोलीस स्टेशनचे विभाजन करून आणखी दोन नवीन पोलीस ठाणे निर्माण करण्यात यावीत अशी आशयाचे सविस्तर प्रस्ताव ठाणे पोलीस आयुक्तालयामार्फत राज्य शासनाकडे सुमारे तीन वर्षांपूर्वीच सादर करण्यात आला आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने पोलीस ठाण्याचे विभाजन करुन नवीन पोलीस ठाणे उभारण्याबाबात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०२३) :**(१) होय.
(२) व (३) याबाबतचा प्रस्ताव पोलीस महासंचालक कार्यालयाकडून शासनास अद्याप प्राप्त नाही. तथापि, यासंदर्भात पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई व पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांचेकडून दि. १३/०७/२०२१ व दि. ०४/१०/२०२२ च्या पत्राव्दारे अहवाल मागविण्यात आला असून, तो शासनास प्राप्त झाल्यानंतर वित्त विभागाच्या मान्यतेने पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदेड जिल्ह्यातील अर्धापूर आणि मुदखेड नगर परिषद क्षेत्रामध्ये म्हाडाव्दारे बांधण्यात आलेली घरे वाटप झाली नसल्याबाबत

**(१६) ५१४६२ (२९-०१-२०२३). श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील अर्धापूर आणि मुदखेड नगर परिषद क्षेत्रामध्ये म्हाडाव्दारे समाजातील अल्प व अत्यल्प उत्पन्न घटकांसाठी घरे बांधण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घरांचे अद्यापही वाटप न झाल्यामुळे वापरा अभावी घराची दुराव्यवस्था झाली असून प्रधानमंत्री आवास योजना राबविण्यासाठी सदरची जागा मिळावी अशी विनंती अर्धापूर आणि मुदखेड नगरपरिषदांकडून म्हाडाकडे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, नगरपालिकांची आर्थिक स्थिती विचारात घेता तत्कालीन गृहनिर्माण मंत्र्यांनी सदर जागा संबंधीत नगरपालिकांना विनामुल्य हस्तांतरीत करण्यास मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अर्धापूर व मुदखेड येथील गाळयांची वापराअभावी दुरावस्था झाली आहे.

अर्धापूर नगर परिषदेमार्फत अर्धापुर येथील गाळयांसाठी मागणी प्राप्त झाली आहे. परंतु, मुदखेड नगर परिषदेकडून अहवाल प्राप्त झालेला नाही.

(३) व (४) विचाराधीन गाळयांचे व भुखंडाचे वाटप झाले असल्या कारणाने, ग्राहक मंचा मधील प्रकरणे, व भाडे खरेदी हप्त्याचा राहिलेला कालावधी या बाबी लक्षात घेता संपूर्ण क्षेत्र हस्तांतरण केल्यास लाभधारक न्यायालयात जाऊन दाद मागण्याची शक्यता आहे. त्यामुळे संपूर्ण वसाहतीचे वाटप या प्रक्रियेत अडकले जाईल हे लक्षात घेता प्राधिकरणाचा अडकलेला निधी मोकळा व्हावा व मोडकळीस आलेल्या घरांचे पुर्नबांधकाम होऊन हे गाळे वापरात यावे या उद्देशाने अर्धापुर व मुदखेड येथील रिक्त गाळयांची म्हाडामार्फत प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत DPR तयार करावा व त्यात म्हाडाचे जे जुने लाभधारक अटी व शर्तीत पात्र ठरत असल्यास त्यांचाही समावेश करावा असा निर्णय म्हाडाने घेतला. व त्यानुसार अर्धापूर येथील गाळे विक्री करीता दिनांक १४/०२/२०२३ रोजी जाहीरात प्रसिद्ध करण्यात आली आहे.

मुदखेड येथील ८६ गाळे अल्प उत्पन्न गट योजनेतील ३२ गाळे बाबत एकुण ७ प्रकरणे राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, औरंगाबाद यांचेकडे अपिल प्रलंबित असल्याने मुदखेड येथील जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड येथे पोलीस आयुक्तालय स्थापन करण्याबाबत**

**(१७) ५१४९४ (१८-०१-२०२३). श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड शहरातील वाढती गुन्हेगारी यापूर्वी झालेले बॉम्बस्फोट आणि खंडणीसाठी झालेली हत्या या बरोबरच, विद्यमान लोकसंख्या आणि शहराची होणारी वाढ या बाबींचा विचार करता स्थानिक नागरिकांबरोबरच सचखंड श्री हजूर साहिब गुरुव्दाराला भेट देणाऱ्या स्थानिक तसेच परराज्यातील आणि परदेशी भाविकांच्या सूरक्षिततेच्या दृष्टीकोनातून नांदेड येथे पोलीस आयुक्तालय स्थापन करण्याची विनंती स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनास केली आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, नांदेड येथे पोलीस आयुक्तालय स्थापन करण्यासंदर्भात शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली, वा करण्यात येत आहे ,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०२३) :**(१) व (२) होय. याबाबत अद्याप शासन स्तरावर प्रस्ताव प्राप्त नाही. नांदेड येथे पोलीस आयुक्तालय स्थापन करण्याचा उपरोक्त प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार तपासून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ईसापूर (जि.नांदेड) धरणात दिगडी उच्च पातळी बंधाऱ्यातून पाणी उपशाद्वारे टाकण्याबाबत**

**(१८) ५१७०३ (२७-०१-२०२३). श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील ईसापूर धरणात असलेली ५८२ दलघमी पाण्याची तूट भरुन काढण्यासाठी दिगडी उच्च पातळी बंधाऱ्यातून पाणी उपशाद्वारे ईसापूर धरणात टाकण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्ध्व पेनगंगा ते निम्न पेनगंगा प्रकल्पातील ५८२ दलघमी शिल्लक पाणी उच्च पातळी बंधाऱ्यामधून उपसा करुन ईसापूर धरणात वळविणे प्रस्तावित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त दोन्ही कामांना उर्ध्व पेनगंगा प्रकल्पाचा भाग म्हणून मान्यता देण्याचा प्रस्ताव महामंडळ कार्यालयाने दि.२१/१२/२०२१ रोजी वा त्या सुमारास शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रस्तावास मंजूरी मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) हे खरे आहे.

उर्ध्व पेनगंगा प्रकल्पाची (ईसापुर धरणाची ५८२ दलघमी व सापळी धरणाची उर्वरीत ९७ दलघमी) ची तुट उपशाद्वारे भरून काढण्याबाबतच्या महामंडळाच्या दि.२१.१२.२०२१ रोजीच्या प्रस्तावास अनुसरुन मुख्य अभियंता जलविज्ञान व धरणसुरक्षितता, नाशिक यांच्याकडून पाणी उपलब्धतता प्रमाणपत्र प्राप्त करून प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यास अनुसरुन मुख्य अभियंता जलविज्ञान व धरण सुरक्षितता नाशिक यांच्या दि.२७.०१.२०२३ च्या

पत्रान्वये पाणी उपलब्धता प्रमाणपत्र निर्गमित केलेले असून त्यानुसार प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगती पथावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील धनगर समाजाला अनुसूचित जमातीचा दर्जा देण्याबाबत

**(१९) ५१७४९ (२३-०१-२०२३). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील धनगर समाजाला अनुसूचित जमातीचा दर्जा मिळण्याकरिता समाजाने वारंवार मागणी करुनही याबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाकडून केंद्र सरकारकडे अद्याप पाठविण्यात आला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात धनगर समाज भटक्या व विमुक्त जातीमध्ये येत असून धनगड व धनगर या नाम फरकाच्या वादामुळे या समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश होत नसल्याच्या तक्रारीही प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने निर्णय घेऊन या समाजाला अनुसूचित जमातीचा दर्जा मिळण्यासाठी केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवून त्याचा पाठपुरावा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (१५-०६-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) मा. मंत्रीमंडळ उप समितीने दिलेल्या निर्देशानुसार टाटा सामाजिक विज्ञान संस्था, मुंबई यांनी सादर केलेल्या धनगर समाजाच्या अहवालाबाबतची नस्ती मा.महाधिवक्ता यांचे अभिप्राय प्राप्त करुन घेण्यासाठी दिनांक २६.०३.२०१९ रोजी विधी व न्याय विभागास सादर करण्यात आली होती. तद्नंतर सदर नस्ती विधी व न्याय विभागामार्फत दिनांक ०४.१०.२०१९ रोजी मा.महाधिवक्ता यांच्याकडे अभिप्रायार्थ सादर करण्यात आली होती. तथापि, सदर नस्ती फेब्रुवारी, २०२३ मध्ये विशिष्ट अभिप्रायाशिवाय विभागास प्राप्त झाली आहे. सध्या सदर प्रस्ताव पुढील निर्णयास्तव वरिष्ठ पातळीवर शासनास सादर करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मालवण तालुक्यातील (जि. सिंधुदुर्ग) येथील होडी व्यावसायिकांच्या मागण्यांबाबत

**(२०) ५२९१२ (२३-०१-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदुर्ग किल्ला प्रवासी वाहतूक वेलफेअर असोसिएशन आणि शिवशक्ती जल पर्यटन चालक - मालक विविध सहकारी संस्था (ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग)) या दोन्ही संघटनांच्या होडी व्यावसायिकांनी त्यांच्या कुटुंबीयांसह जिल्हाधिकारी कार्यालयासमोर साखळी उपोषण केले , हे खरे आहे काय,
(२) असल्यास या होडी व्यावसायिकांच्या मागण्या संदर्भात महाराष्ट्र मेरीटाइम बोर्ड च्या अधिकाऱ्यांकडून कोणत्या स्वरूपाची कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दादाजी भुसे (२०-०६-२०२३) :**(१) होय खरे आहे.
(२) व (३) सिंधुदुर्ग किल्ला प्रवासी वाहतुक वेल्फेअर असोसिएशन आणि शिवशक्ती जल पर्यट्न चालक-मालक विविध सहकारी संस्था या दोन्ही संघटनांचे होडी व्यवसायिक हे विविध मागण्या संदर्भात त्यांच्या कुटुंबीयांसह दि.१४.०८.२०२२

रोजी जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग कार्यालयासमोर साखळी उपोषणास बसले होते.

सदर उपोषणाच्या अनुषंगाने दि.११.१०.२०२२ रोजी दोन्ही संस्थांच्या प्रतिनिधीसमवेत महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या मुख्यालयात बैठक घेण्यात आली.

सदर बैठकीत होडी व्यावसायिकांच्या विविध मागण्यांवर सविस्तर चर्चा होऊन होडी व्यावसायिकांनी उपोषण मागे घेतले.

---

**श्री गुरुदेव विद्या प्रसारक मंडळ, म्हसोना, (ता.अचलपूर, जि. अमरावती) येथील आश्रम कर्मचाऱ्यांचे वेतन देण्याबाबत**

**(२१) ५४५९२ (१८-०१-२०२३). श्री.राजकुमार पटेल (मेळघाट) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री गुरुदेव विद्या प्रसारक मंडळ, म्हसोना, (ता.अचलपूर, जि. अमरावती) या आश्रम शाळेची आयुक्त आदिवासी विकास विभाग, नाशिक यांनी दिनांक २२ सप्टेंबर, २०२० रोजी मान्यता रद्द केलेल्या आदेशाला माननीय उच्च न्यायालय नागपूर यांनी रीट पिटीशन क्रमांक १९०६/२०२१ मध्ये आदिवासी विभागाचा आदेश रद्द करून शाळा सुरू ठेवण्याचे आदेश दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी आयुक्त यांनी दिनांक ११ फेब्रुवारी, २०२२ रोजी पुन्हा शाळेची परवानगी रद्द केली असता संस्थेने पुन्हा या आदेशा विरोधात माननीय न्यायालयात याचिका क्रमांक १०२३/२०२२ सादर केलेली असता उच्च न्यायालयाने दिनांक ०९ मार्च, २०२२ रोजी पुन्हा स्थगिती दिली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास ,संबंधित आश्रम शाळा नियमित चालू असताना संस्थेच्या कर्मचाऱ्यांचे वेतन देण्यात आले नाहीत हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित संस्थेतील कर्मचाऱ्यांचे वेतन देण्यासंबंधी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (०५-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे

(२) हे खरे आहे

(३) हे खरे नाही

(४) शाळा सुरु असेपर्यंत शाळेमध्ये कार्यरत ३७ शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वेतन देण्यात येत होते. शाळेची मान्यता रद्द केल्यानंतर ३० कर्मचाऱ्यांचे इतर शाळेमध्ये समायोजन करुन त्यांना नियमानुसार वेतन अदा करण्यात येत आहे. तसेच ऊर्वरित ७ कर्मचाऱ्यांपैकी २ कर्मचारी निलंबित असल्यामुळे ५ कर्मचाऱ्यांचे समायोजन करण्यात आले होते. परंतू सदर ५ कर्मचाऱ्यांना समायोजित शाळेने रुजू करुन न घेतल्यामुळे सदर कर्मचाऱ्यांचे नव्याने समायोजन आदेश देवुन दुसऱ्या शाळांवर समायोजनाने नियुक्ती देण्यात आली. या कर्मचाऱ्यांना समायोजित ठिकाणी रुजू होईपर्यंतच्या कालावधीचे वेतन दिनांक ०८ जून, २०१६ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार अदा करण्यात आले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दानापूर (ता.भोकरदन, जि.जालना) येथील जुई धरणातून डाव्या-उजव्या कालव्याद्वारे शेतक-यांना पाणी देण्याबाबत**

**(२२) ५४७६५ (२२-०१-२०२३). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दानापूर (ता.भोकरदन, जि.जालना) येथील जुई धरणातून डाव्या-उजव्या कालव्याद्वारे चार नंबर चारीपर्यंत रब्बी हंगामातील हरभरा, गहू, मका, ज्वारी आदीं पिकांसाठी पाणी सोडण्यात येणार असून याचा फायदा दानापूर, देहेड, गोदरी,

वडशेद, निंबोळा, ताडकळस, सिपोरा बाजार तसेच आदी गावांतील शेतक-यांना मोठया प्रमाणात होणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कालव्यातील पाणी ज्या शेतक-यांना हवे आहे त्यांनी भोकरदन येथील पाटबंधारे विभागाकडे रितसर अर्ज दाखल करण्याचे आवाहन करण्यात आल्याची बाब दि. १६ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, त्यानुसार आतापर्यंत किती शेतक-यांनी पाणीपट्टी अर्ज भरणा केली असून किती शेतकरी वर्गास पाणी सोडण्याचे नियोजन कशाप्रकारे करण्यात येणार आहे त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.

जुई मध्यम प्रकल्पाच्या डाव्या कालव्यावरील वितरीका क्र.१ ते ४ वरील मौ.दानापूर, देहेड,वडशेद, व गोद्री या गावातील शेतकऱ्यांना फायदा होईल. तसेच डाव्या कालव्यावरील ९.१७ किलोमीटर वरील HP Culvert चे दुरुस्ती विषयक काम झाल्यास निंबोळा, ताडकळस, शिपोरा बाजार या गावांना पाणी देणे शक्य होईल.

(२) होय, हे खरे आहे.

कार्यकारी अभियंता, जालना पाटबंधारे विभाग, जालना या विभागाचे जाहिर प्रगटन (दैनिक दिव्य मराठीमध्ये प्रकाशित दि.१६/११/२०२२ आवृत्ती) जापाविजा /तांशा /२८६३, दि.१४/११/२०२२ रोजी सर्व लाभधारक शेतकऱ्यांना पाणी मागणी अर्ज विहीत नमुन्यात पाटबंधारे विभागाकडे सादर करणेबाबत कळविण्यात आले आहे.

(३) एकूण २५३ शेतकऱ्यांनी पाणी अर्ज विभागीय कार्यालयाकडे भरले आहे. एकूण मागणी क्षेत्र १५५ हेक्टर आहे.

शेतकऱ्यांच्या मागणीनुसार दि.२६/१२/२०२२ ते दि.०६/०१/२०२३ या दरम्यान कालव्याद्वारे प्रथम पाणी पाळी व दि.०१/०२/२०२३ ते दि.१०/०२/२०२३ दरम्यान दुसरी पाणीपाळी कार्यक्रम राबविण्यात आला आहे.

---

**औरंगाबाद शहरात पंतप्रधान आवास योजनेअंतर्गतच्या घरांच्या कामास सुरुवात करण्याबाबत**

**(२३) ५४८०५ (२९-०१-२०२३). श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा) :**सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रत्येक गरिबाला हक्काचे घर मिळावे याकरिता केंद्र शासनाने सुरु केलेल्या प्रधानमंत्री आवास योजना आणि मुख्यमंत्री गृहनिर्माण योजनांची मागील दोन ते तीन वर्षात एकही बैठक झाली नसल्याने हजारो गरजू सामान्य जनता हक्काच्या घरापासून वंचित असल्याची बाब माहे, ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे खरे आहे काय,

(२) असल्यास, औरंगाबाद शहरात पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत सुमारे ४० हजार घरे उभारण्याकरिता सर्व परवानग्या देऊन सहा महिन्यांचा कालावधी होऊनही अद्यापही या कामास सुरुवात झाली नसल्याचे माहे, नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त योजनांचा तात्काळ आढावा बैठक घेऊन प्रधानमंत्री आवास योजना आणि मुख्यमंत्री गृहनिर्माण योजनांचा लाभ राज्यातील नागरिकांना देण्यासाठी तसेच औरंगाबाद येथील परवानगी दिलेली घरे उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०७-२०२३) :** (१) प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत एकही बैठक झाली नाही, हे खरे नाही.

(२) व (३) छत्रपती संभाजीनगर महानगर पालिकांतर्गत राबविण्यात येणाऱ्या प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) च्या अनुषंगाने शासन स्तरावर विविध लोकप्रतिनिधी मार्फत तक्रारी प्राप्त झाल्याने, सदर प्रकरणाच्या चौकशीसाठी अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. दि. ०६.०२.२०२३ रोजी समितीच्या शिफारशी प्राप्त झाल्या असून त्यानुसार छत्रपती संभाजीनगर महानगर पालिकेमार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

त्यानुसार यापूर्वी राबविण्यात आलेली निविदा प्रक्रिया सदोष असल्यामुळे रद्द करण्यात आली असून दिनांक ०५.०६.२०२३ रोजी नव्याने निविदा प्रसिध्द करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील अनुदानित आश्रमशाळांमध्ये कर्मचारी प्रत्यक्ष आश्रमशाळेत हजर न राहता हजेरीपटावर स्वाक्षरी करीत असल्याबाबत

**(२४) ५४८९२ (१८-०१-२०२३). डॉ.किरण लहामटे (अकोले) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील आदिवासी भागातील विद्यार्थ्यांसाठी शासनाने अनुदान तत्वावर आश्रमशाळा सुरु करण्यात येऊन या आश्रमशाळांना दरवर्षी शासनाकडून विविध प्रकारे अनुदान देण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अनुदानित आश्रमशाळांमधील अनेक कर्मचारी प्रत्यक्ष आश्रमशाळेत हजर न राहताच महिन्यातून पंधरा-पंधरा दिवसांनी हजेरीपटावर स्वाक्षरी करीत असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याच्या तक्रारी विद्यार्थी व पालकांनी शासनाकडे केल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (०५-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे
(२) अशा आशयाचे तक्रार अर्ज प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही

---

## नळगंगा प्रकल्पावरील (जि.बुलढाणा)मलकापूर उपविभागातील ३१ संस्था कार्यकाळ संपलेला असतानाही पाणीवापर करित असल्याबाबत

**(२५) ५४९०७ (२२-०१-२०२३). श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजु पारवे (उमरेड), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्ह्यातील नळगंगा प्रकल्पावरील मलकापूर उपविभागातील ३१ संस्थांचा पाणी वापर कार्यकाळ बारा वर्षापासून संपलेला असून निवडणुका न घेताच या संस्थांचा पाणी वापर सुरू असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर संस्थांचा कालावधी संपल्यावरही प्रारंभीच्या काळातील संस्थाचालक मंडळच पाणी वापर संस्थेवर कार्यरत असून यातील काही संचालक अध्यक्ष आज हयात नाहीत, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, मुदत संपलेल्या पाणी वापर संस्थेकडून वाटप करण्यात येत असलेल्या पाणी वाटप व बिलाची वसुली बाबत होत असलेल्या गैरप्रकारावर मलकापूर पाटबंधारे विभागीय अधिकारी यांचेकडून हेतूपुरस्सर दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संस्थाचालक मंडळ बरखास्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे,नळगंगा प्रकल्पाच्या कालवा स्तरावरील ३२ पाणी वापर संस्थांची निवडणुक पाटबंधारे विभागाच्या म.सिं.प.शे.व्य. २००५ चे कायद्यान्वये सन २०१० मध्ये पाटबंधारे

विभाग बुलडाणा मार्फ़त घेण्यात आली होती. सदर पा.वा.संस्थांचे निवडणूक झालेल्या संचालक मंडळामधून अध्यक्ष, सचिव, संचालक मंडळ ६ वर्षासाठी तयार करुन पा.वा.संस्थेचे लाभक्षेत्र त्या संस्थांना हस्तांतरीत करण्यात आले. त्यानुसार सदर संस्थांचा कार्यकाळ हा सन २०१६ मध्ये संपला आहे व त्यास ६ वर्षाचा कालावधी झालेला आहे.
(२) होय, हे खरे आहे. निवडणूक न झाल्यामुळे प्रारंभीचे संचालक मंडळ सदर पा.वा.संस्थांचा कार्यभार पाहत आहेत. तसेच सदर ३२ पाणी वापर संस्थापैकी वियोगी महाराज पा.वा.सं. उमाळी आणि छत्रपती पा.वा.सं. वाघुड या दोन पाणी वापर संस्थांमधील दोन संचालक सध्या हयात नाहीत.
(३) हे खरे नाही,
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गिरणा धरणाच्या मौजे कनाशी (ता.भडगांव, जि.जळगांव) पाटचारीवरुन पासर्डी शिवारात नविन पाटचारी मंजूर झालेल्या पाझर तलावामध्ये पाणी सोडणेबाबत

**(२६) ५५०७२ (२२-०१-२०२३). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गिरणा धरणाच्या मौजे कनाशी (ता.भडगांव, जि.जळगांव) पाटचारीवरुन पासर्डी शिवारात नविन पाटचारी मंजूर झालेल्या पाझर तलावामध्ये पाणी सोडणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १० ऑक्टोबर, २०२२ रोजी त्यासुमारास मा.उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना लेखी निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या लेखी निवेदनानुसार शासनाने कोणता निर्णय घेतला आहे काय, असल्यास त्यांचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०२३) :** (१) अशंत: खरे आहे.
सदर विषयांकित प्रकरणाचे निवेदन दिनांक ११/०१/२०२२ च्या पत्रान्वये प्राप्त झालेले आहे.
(२) क्षेत्रिय कार्यालयाकडून प्राप्त अहवालानुसार सविस्तर सर्वेक्षणानुसार सदर काम करणे शक्य होणार नाही.
कालव्याच्या तळाच्या तलांकापेक्षा पाझर तलावाचा तलांक ०.८२ मी, ने उंच असल्याने जामदा उजव्या कालव्यातून पाझर तलावात पाणी गुरुत्वाकर्षणाने टाकणे तांत्रिकदृष्टया शक्य नाही, असे दिसून येते. याकरिता उपसा सिंचनाद्वारे सदरहू पाझर तलाव भरावा लागेल.
तसेच पासर्डी शिवारातील सदर पाझर तलाव भरणे बाबतची तरतूद गिरणा धरणाच्या मंजूर मुळ जल नियोजनात समाविष्ट नाही. त्यामुळे जल नियोजनात सदर कामाकरिता पाणी शिल्लक नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौ.कारवे (ता.चंदगड,जि.कोल्हापूर) येथे नवीन पोलिस स्टेशन उभारण्याबाबत

**(२७) ५५४५२ (२४-०१-२०२३). श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हयातील चंदगड तालुका हा डोंगराळ व दुर्गम भागातील असून त्या अंतर्गत १०९ ग्रामपंचायती येत असून सुमारे १५० ते २०० वाडया व वस्त्यांचा समावेश आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्याचा क्षेत्रिय विस्तार पाहता चंदगड हे तालुक्याचे मुख्य ठिकाण वगळता तालुक्यात इतरत्र कोणतेही पोलिस स्टेशन नसल्यामुळे तेथे कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण होत असून, माहे जुलै, २०२१ मध्ये तालुक्यातील नागणवाडी पेट्रोल पंपावरील कर्मचाऱ्यांना पिस्तुल व तलवारीचा धाक दाखवून रोख रक्कम लुटून मारहाणदेखील करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चंदगड तालुक्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी मौजे कारवे (ता.चंदगड) येथे नवीन पोलिस स्टेशन निर्माण करण्यात यावे अशी मागणी मा.लोकप्रतिनिधीकडून शासनास करण्यात आली असून त्याबाबत दि. १६ जून २०२१ रोजीच्या पत्रान्वये मा.गृह राज्यमंत्री (ग्रामीण) यांचेकडे मागणी देखील करण्यात आली आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कारवे येथे नवीन पोलिस स्टेशन निर्माण करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०२३) :**(१), (२), (३) व (४) होय. मौजे कारवे (ता. चंदगड) येथे नवीन पोलिस ठाणे निर्माण करण्याच्या अनुषंगाने अहवाल शासनास सादर करणेबाबत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना दि. १२/०७/२०२१ च्या पत्राव्दारे कळविण्यात आले आहे. तथापि, अद्याप अहवाल शासनास अप्राप्त असून, तो प्राप्त झाल्यानंतर वित्त विभागाच्या मान्यतेने योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मिरा-भाईंदर शहरातील पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटिव्ही CCTV कॅमेरा बंद असल्याबाबत**

**(२८) ५६४८८ (२५-०१-२०२३). श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मिरा-भाईंदर शहरातील पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटिव्ही CCTV कॅमेरा लावण्यात आलेले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जानेवारी २०२१ ते आजमितीपर्यंत बऱ्याचदा CCTV कॅमेरा बंद पडल्याची घटना झालेल्या आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, पोलीस ठाण्यातील बंद सीसीटीव्ही बाबत मा.सर्वोच्च न्यायालयाच्या SLP क्र. ३५४३/२०२० मधील दिलेल्या आदेशानुसार संबंधित प्रभारी पोलीस निरीक्षक यांच्याविरूद्ध कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०२३) :**(१) होय,
(२) मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रामधील काशिमीरा पोलीस ठाण्यातील सीसीटीव्ही कॅमेरे दि.०१.०९.२०२१ ते दि.२१.०९.२०२१ पर्यंत डी.व्ही.आर मशीन (३२ चॅनलचे) बंद पडल्यामुळे बंद होते. सदर मशीन बदली करण्यात आली असून तशी नोंद दि.१६.०९.२०२१ रोजी सविस्तर स्टेशन डायरीमध्ये घेण्यात आली आहे.

तसेच उत्तन सागरी पोलीस ठाणेमधील प्रभारी अधिकारी यांच्या कक्षेतील कॅमेरा दि.१४.०६.२०२१ ते दि.२६.०६.२०२१ पर्यंत बंद होता. सदरचा कॅमेरा दि.३०.०७.२०२१ ते दि.२१.०९.२०२१ पर्यंत चालू होता, परंतु रेकॉर्डींग बंद होती. तसेच सदर कॅमेऱ्याचे दि.२१.०७.२०२२ ते दि.२८.०७.२०२२ पर्यंत स्क्रिनवर चित्रीकरण दिसत नव्हते.
(३) व (४) तांत्रिक बिघाड झाल्यामुळे सीसीटीव्ही कॅमेरे बंद होते. त्यामुळे कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात शासकीय विभागात लाचखोरीचे प्रमाण वाढत असल्याबाबत**

**(२९) ५६६२७ (३०-०४-२०२३). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.नितेश राणे (कणकवली), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर),**

**श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.निलेश लंके (पारनेर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महसूल यंत्रणा लाचखोरीत आघाडीवर असून गेल्या वर्षभरात १७० प्रकरणांमध्ये २३६ महसूल कर्मचारी लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने पकडले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलिस यंत्रणा, महापालिका आणि जिल्हा परिषद, महावितरण व राज्य उत्पादन शुल्क विभागातही लाचखोरीचे प्रमाण वाढले असून लाचलुचपत विभागाकडून कारवाई करून पकडण्यास आलेल्या कर्मचाऱ्यावर काही प्रकरणात निलंबित करून चौकशी केल्या जाते तसेच अनेक प्रकरणात लाचखोर कर्मचाऱ्यांचा आकडा फार मोठा असून त्यांचावर कालमर्यादेत कार्यवाही होत नसल्याने ते पुन्हा सेवत कार्यरत करण्यात येते, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात आतापर्यंत ७४० लाच प्रकरणांची नोंद झाली असून सुमारे ३ कोटी २२ लाख रुपयांची लाच मागण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीच्या अनुषंगाने शासकिय विभागातील लाचखोरीचे प्रमाण कमी करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय ,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०२३) :** (१), (२) व (३)

I. दिनांक ०१/०१/२०२२ ते दि. ३१/१२/२०२२ या कालावधीत लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत एकुण ७२८ सापळा कारवाया करण्यात आल्या आहेत. सदर

कारवायांमध्ये महसूल / भूमी अभिलेख/नोंदणी विभागाच्या एकूण १७४ सापळा कारवायांमध्ये २४६ आरोपी लोकसेवक असून त्यामध्ये ५३ खाजगी व्यक्तींचा समावेश आहे.

II. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अभिलेखानुसार पोलीस विभागाची १६१ प्रकरणे, महानगरपालिकेची ४७ प्रकरणे, जिल्हा परिषद ४३ प्रकरणे, म.रा.वि.वि.कं. मर्या. ५० प्रकरणे व राज्य उत्पादन शुल्क विभागाची ०४ प्रकरणे आहेत.

III. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अभिलेखानुसार दिनांक ०१/०१/२०२२ ते दि. ३१/१२/२०२२ या कालावधीत एकूण ७२८ सापळा कारवायांमध्ये एकूण रु.३,२४,४५,८९५/- इतकी रक्कम लाच म्हणून स्विकारताना कारवाई करण्यात आली आहे.

(४) शासकीय विभागातील लाचखोरीचे प्रमाण कमी करण्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात-:

i. भ्रष्टाचारास प्रतिबंध करण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून घटक स्तरावर वेळोवेळी जनजागृती करण्यात येते.

ii. तसेच भ्रष्टाचारासंबंधी तक्रार करण्यासाठी १०६४ टोल फ्री दुरध्वनी क्रमांक लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून उपलब्ध करण्यात आलेला आहे.

iii.भ्रष्टाचारासंबंधी तक्रार करण्यासाठी ९९३०९९७७०० व्हाटसॲप नंबर तसेच मोबाईल ॲप्लीकेशन ची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

iv. तसेच शासकीय कार्यालयात दर्शनी भागात भ्रष्टाचाराबाबत तक्रार करण्यासंबंधी नागरिकांकरिता फलक लावण्यात येतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील नियोजन समित्यांना शासनाने जाहीर केलेला निधी खर्चा विना पडून असल्याबाबत

**(३०) ५६८५० (३०-०४-२०२३). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), ॲड.अशोक पवार (शिरुर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नियोजन समित्यांना (जिल्हावार) शासनाने जाहीर केलेल्या १४,०४२ कोटी रुपयाच्या निधीपैकी आतापर्यंत केवळ १८७३ कोटी रुपये म्हणजे केवळ सरासरी १४-१७ टक्केच निधी विकासकामावर खर्च झाला झाला असून ८६% निधी खर्चा विना पडून असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्वांगीण विकास करण्यासाठी आवश्यक असलेला निधी खर्चाविना पडून राहण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्याअनुषंगाने विकासकामावर खर्च न करण्याऱ्या संबधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०२३) :** (१) आर्थिक वर्ष २०२२-२३ करीता जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत सर्व जिल्ह्यांना रुपये १३,३४० कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला होता.

(२) व (३) जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत वितरीत केलेल्या निधीपैकी मार्च २०२३ अखेरपर्यंत ९९.५५ टक्के एवढा निधी खर्च झालेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

## राज्यातील अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडे जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी अभावी प्रलंबित असल्याबाबत

**(३१) ५७३२५ (२८-०४-२०२३). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जमाती प्रमाणपत्र समित्यांकडे सुमारे १८००० जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी अभावी प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी २०२३ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी करुन उमेदवारास दिल्यानंतरच आदिवासी मुलांचे शैक्षणिक व नोकरी विषयक कामे होतात, असे असतांना अनुसूचित जमाती प्रमाणपत्रांची पडताळणी करण्याबाबत विलंब का होत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार प्रलंबित जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी करुन संबंधितांना वितरित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. विजयकुमार गावीत (२१-०६-२०२३) :** (१), (२) व (३) राज्यातील अनुसूचित जमाती प्रमाणपत्र समित्यांकडे जानेवारी, २०२३ पर्यंत १७२७६ जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी प्रकरणे प्रलंबित आहेत. शासन तसेच आयुक्त कार्यालयांकडून समित्यांकडील प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याबाबत नियमित समिती कार्यालयाचा साप्ताहिक

आढावा घेण्यात येतो. त्याचप्रमाणे समितीकडील प्रलंबित प्रकरणे "गती अभियान" अंतर्गत निकाली काढण्यात येत आहेत. अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणीची कार्यवाही ही ऑनलाईन व्हावी तसेच अर्जदारास विविध टप्प्याची माहिती ऑनलाईन उपलब्ध व्हावी यासाठी माहिती तंत्रज्ञानाच्या अत्याधुनिक पध्दतीचा वापर करुन दिनांक ०१.०५.२०१६ पासून समितीचे कामकाज etribevalidity.mahaonline.gov.in वर etribe validity "आदि प्रमाण प्रणाली" या संगणकीय प्रणालीव्दारे सुरु करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कळमोडी (ता.खेड, जि.पुणे) येथील प्रकल्प बाबत

**(३२) ५७४३५ (२८-०४-२०२३). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कळमोडी (ता.खेड, जि.पुणे) येथील प्रकल्पा बाबत माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी (सुप्रमा) शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रस्तावातील बदल/सूचना यांचा सर्वसाधारण तपशील काय असून प्रस्तावास मान्यता देण्यास होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कळमोडी प्रकल्पास सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी (सुप्रमा) मंजुरी बाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०७-२०२३) :** (१) हे अशंत: खरे आहे.
कलमोडी मध्यम ( आरळा ) प्रकल्प, ता. खेड जिल्हा पुणे या प्रकल्पाचा रु. १९८.४९ कोटी इतक्या किंमतीचा प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांच्याकडून दिनांक ०२/०१/२०२३ रोजीच्या पत्रान्वये शासनास प्राप्त झाला आहे.
(२) व (३) उपरोक्त प्रस्तावाची छाननी व तपासणी करण्यात आली असता काही शेरे उपस्थित झाले आहेत. सदर उपस्थित मुद्यांबाबतच्या शेरेपुर्तता अहवालासह प्रस्ताव शासनास फेर सादर करण्याबाबत कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांना शासन पत्र दिनांक १७/०५/२०२३ अन्वये कळविण्यात आले आहे. उपस्थित झालेल्या शे-याचे यथायोग्य शेरेपुर्ततेसह प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यानंतर त्यावर सु.प्र.मा बाबतची पुढील कार्यवाही करणे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सीना-माढा उपसा सिंचन योजना (ता.माढा,जि.सोलापूर) या योजनेतील शेतकरी भूसंपादनाचा मोबदल्यापासून वंचित असल्याबाबत

**(३३) ५७५०३ (२८-०४-२०२३). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सीना-माढा उपसा सिंचन योजना २००४ साली अंशता कार्यान्वीत झालेली योजना असून या योजनेची एकुण १६००० हेक्टर सिंचन निर्मीती क्षमता आहे. या उपसा सिंचन योजनेचे कामास १८ वर्षे पुर्ण झाले असून जलसंपदा व महसूल व कृषी विभागातील अधिकाऱ्यांमध्ये समन्वय नसल्यामुळे प्रकल्प बाधित काही शेतकऱ्यांना अद्यापपर्यंत भूसंपादन मोबदला मिळालेला नाही हे खरे आहे काय.
(२) असल्यास, माढा तालुक्यातील निमगांव, बादलेवाडी, पिंपळनेर, शेडशिंगे, लऊळ, उजनी, चिंचोली, व्होळे, भेंड, अरण, वरवडे, जाधववाडी, बैरागवाडी यासह अनेक गावातील शेतकऱ्यांनी सुरुवातीच्या काळात प्रकल्पासाठी आपल्या जमिनी दिल्या त्यावेळी कामे सुरु होण्यासाठी सर्व शेतकऱ्यांनी मदत केली. शेतकऱ्यांना चालू बाजार भावाप्रमाणे

जमिनीचा मोबदला देण्यासाठी नुकसान भरपाईची मागणी केली असता संयुक्त पंचनामे,जमिनीचे,फळझाडांचे मुल्यांकन होत नाही,मोजणी करणेसाठी अपूरा कर्मचारी वर्ग अशा विविध कारणांमुळे शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळत नाही हे खरे आहे काय.

(३) असल्यास, सदर योजनेच्या भूसंपादन कामासाठी संयुक्त मोजणी करणे अभावी भूसंपादनाची कार्यवाही प्रलंबित आहे भूसंपादन तातडीने करणेची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वारंवार प्रशासनाकडे केलेली आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुसार सदरहू योजनेची भूसंपादन कामे विहीत कालावधीमध्ये पुर्ण करुन संबंधित शेतकऱ्यांच्या संपादीत केलेल्या जमिनींचा मोबदला देणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०७-२०२३) :** (१) अंशत : खरे आहे.

सीना माढा उपसा सिंचन योजनेसाठी एकूण ९८१ हे. क्षेत्र आवश्यक आहे. त्यापैकी मार्च, २०२३ अखेरपर्यंत भुसंपादन कायदा १८९४ व २०१३ नुसार/ थेट खरेदीद्वारे एकंदर ६०८ हे. क्षेत्र अधिग्रहित करून संबंधीतांना मोबदला अदा करण्यात आला असून, उर्वरीत ३७३ हे. क्षेत्रापैकी २४५ हे. क्षेत्र अधिग्रहित करण्यासाठी नवीन भूसंपादन कायद्यान्वये / थेट खरेदीने संपादित प्रक्रिया क्षेत्रिय स्तरावर सुरू आहे. १२८ हे. क्षेत्रासाठी भूसंपादनाची प्रक्रिया हाती घेणे बाकी आहे.

(२) अंशत: खरे आहे.

माढा तालुक्यातील निमगांव-टे, बादलेवाडी, पिंपळनेर, शेडशिंगे, लऊळ, उजनी-मा, चिंचोली, व्होळे-खु, भेंड, अरण, वरवडे, जाधववाडी-मो, बैरागवाडी या गावांतील एकंदर ६२८ हे. क्षेत्र आवश्यक असून त्यापैकी ४५५ हे.आर. कालव्यासाठी अधिग्रहित करण्यात आले असून, ११३ हे क्षेत्र खरेदी प्रक्रिया सुरू आहे. याप्रकरणी सुमारे रू.४५ कोटी इतका मोबदला वाटप करणेत आला आहे. उर्वरीत प्रकरणी ६० हे. क्षेत्र अधिग्रहित करण्याची प्रक्रिया विविध स्तरावर सुरू आहे.

(३) अंशत: खरे आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या मागणीनुसार जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्याकडे लोकप्रतिनिधी, बाधित शेतकरी व संपादन मंडळ यांची बैठक घेण्यात आली असून सदर बैठकीमध्ये दिलेल्या निर्देशानुसार संयुक्त मोजणी प्रक्रिया क्षेत्रीय स्तरावर सुरू आहे.

(४) भूसंपादन प्रक्रिया व संपादीत जमिनींचा मोबदला वाटपाचे काम क्षेत्रीय स्तरावर प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर जिल्ह्यातील वागीगसाठी दिलेल्या महाजनकोच्या चांगल्या कोळशांमध्ये वेस्ट मटेरियल मिसळले जात असल्याबाबत

**(३४) ५७६६२ (३०-०४-२०२३). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील वागीगसाठी दिलेल्या महाजनकोच्या चांगल्या कोळशांमध्ये येसंबा (वराडा ) येथील महामिनरल माईनिंग अँड बेनीफिशिएशन प्रायव्हेट लिमिटेड मध्ये वेस्ट मटेरियल मिसळला जातो, हाच कोळसा १२ हजार रुपये प्रति टन दराने विकला जातो, त्यामुळे महाजनकोला पाठविण्यात येणाऱ्या कोळशात लाखो टन कोळशाची कमी येत असल्याचे माहे डिसेंबर २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खापरखेडा कोराडी पावर प्लांट चे लोड फॅक्टर कमी होत असल्याने परिसरात धुळीचे प्रदूषण होत असतानाच महावितरण ला चांगल्या प्रतीचा कोळसा मिळत नसल्याने विजेचे उत्पादन कमी होत असल्याने महावितरण ला राज्याला जास्त दराने विदयुत पुरवठा करावा लागतो, हे ही खरे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकणी शासनाने चौकशी करून अहवाल मागविला आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, अहवाल्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाने हिंद महा मिनरल एलएलपी यांना दिलेल्या कंत्राटानुसार नागपूर जिल्ह्यातील येसंबा (वराडा) या वॉशरीमध्ये धुतलेल्या कोळशाची वाहतूक ट्रक मधुन खापरखेडा व कोराडी विद्युत केंद्रासाठी होते. विद्युत केंद्रात प्राप्त झालेल्या वॉश कोलची तपासणी योग्य होण्यासाठी ऑगर मशीनचा वापर करण्यात येतो. त्या तपासणी अंती कोळशाची गुणवत्ता अपेक्षेप्रमाणे आढळून आलेली आहे. तसेच टाकऊ साहित्य मिसळल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) हे खरे नाही.

माहे डिसेंबर २०२२ मध्ये खापरखेडा व कोराडी येथील लोड क्षमता (Loadability) मध्ये सुधारणा झालेली आहे. तसेच माहे डिसेंबर २०२२ मध्ये लोड क्षमता (Loadability) मध्ये कोराडी ६६० मेगा वॅट- ८१.७१% कोराडी २१० मेगा वॅट ९९.२२% आणि खापरखेडा ५०० मेगा वॅट- ८४.५३% इतकी सुधारणा दिसुन आलेली आहे. तसेच दोन्ही पॉवर प्लांट ठरविलेलया प्रदुषणाच्या मापदंडाच्या आत काम करित आहेत.

(३), (४), (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला जिल्ह्यातील नेरधामणा प्रकल्प पूर्ण करणे बाबत

**(३५) ५७८९७ (३०-०४-२०२३). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील नेरधामणा प्रकल्पाचे माहे जुन, २०२० अखेर ९० टक्के काम पुर्ण होऊन मागील २ वर्षापासून प्रकल्पात १०० टक्के पाणीसाठा संचय केल्या जात आहे, हे खरे आहे काय,
(२) सदर नेरधामणा प्रकल्पा अंतर्गत सिंचनासाठी बंदिस्त पाईपद्वारे पाणी पुरवाठा करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,
(३) सदर प्रकल्पाचे पंपगृह व बंदिस्त पाईप लाईनचे काम अद्याप पर्यंत करण्यात आले नसल्याने प्रकल्पातील पाणीसाठा दोन वर्षापासून विना वापर पडून आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकल्पाचे शेतकाम शासन केंव्हा पुर्ण करणार आहे,
(५) असल्यास, सदर प्रकल्पाची कामे प्रलंबित असल्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०७-२०२३) :** (१) होय,

पूर्णा बॅरेज-२ (नेर-धामणा) प्रकल्पामध्ये सन २०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२ मध्ये १०० टक्के पाणीसाठा संचय करण्यात आला आहे.

(२) होय,

पूर्णा बॅरेज-२ (नेर-धामणा) प्रकल्पाअंतर्गत सिंचनासाठी बंदिस्त नलिका वितरण प्रणालीद्वारे पाणी पुरवठा करण्याचे नियोजीत आहे.

(३) होय,

प्रकल्पस्थळी असलेल्या मऊ भुस्तरामुळे तेथील भुधारण क्षमता अतिशय कमी येत असुन पंपगृहाचे संकल्पनास अडचणी असल्यामुळे प्रकल्पाचे पंपगृह व बंदिस्त पाईप लाईनचे काम अद्याप पर्यंत करण्यात आले नसल्याने प्रकल्पातील पाणीसाठ्याचा वापर झालेला नाही.

(४) पूर्णा बॅरेज-२ (नेर-धामणा) प्रकल्पाचे पंपगृहाचे व बंदिस्त नलिका वितरण प्रणालीचे काम जुन-२०२५ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रकल्पस्थळी असलेल्या मऊ भुस्तरामुळे तेथील भुधारण क्षमता अतिशय कमी येत असल्याने पंपगृहाचे संकल्पनास अडचणी येत आहेत. पारंपारीक पंपगृहाऐवजी इतर पर्याय अभ्यासण्यात आले असुन नदीच्या दोन्ही तिरावर गोलाकार पंपगृहाचे संकल्पन मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना , नाशिक येथे तपासणी अंतर्गत आहे.

---

## पुणे जिल्हयातील जनाई-शिरसाई उपसा सिंचन योजनेबाबत

**(३६) ५८२०४ (३०-०४-२०२३). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), ॲड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील बारामती, दौंड आणि पुरंदर तालुक्यातील अवर्षण प्रवण क्षेत्रातील शेत जमिनीला पाणी पुरविण्यासाठी शासनामार्फत खडकवासला प्रकल्पातून जनाई-शिरसाई उपसा सिंचन योजना राबविण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे महानगरपालिकेने खडकवासला प्रकल्पातून पिण्यासाठी पाणी आरक्षित केल्यामुळे जनाई-शिरसाई योजनेला पूर्ण क्षमतेने पाणी मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ओपन कालव्याऐवजी बंद नलीका वितरण प्रणालीद्वारे पाणी पुरवठा केल्यास प्रकल्पाची सध्याची कार्यक्षमता ५० टक्क्याहून ७७ टक्क्यापर्यंत वाढू शकणार असून त्यासाठी ४५०/- कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चोकशी करुन निधीची तरतूद करुन या खर्चास मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

खडकवासला प्रकल्प जल नियोजनानुसार जनाई शिरसाई उपसा सिंचन योजनेसाठी एकूण ३.६० टीएमसी पाणी वापर मंजूर आहे. तसेच पुणे महानगरपालिकासाठी (पुणे शहराच्या पिण्यासाठी) ८.३० टीएमसी ची तरतूद आहे. परंतु पुणे शहराचा प्रत्यक्ष पाणी वापर जास्त असल्याने राष्ट्रीय जलनिती व राज्य जल निती नुसार पिण्यासाठी पाणी उपलब्ध करून देण्यास प्रथम प्राधान्यक्रमानुसार पाणी उपलब्ध करून देण्यात येते. पिण्याचे पाणी दिल्यानंतरच सिंचनाला पाणी देण्याची तरतूद असल्याने खडकवासला प्रकल्पात सिंचनासाठी कमी पाणी उपलब्ध राहते. प्रकल्पातील उर्वरीत पाणी जनाई शिरसाई उपसा सिंचन योजनेसाठी उपलब्ध करून समन्यायी तत्वावर सर्व गावांना देण्यात येते.

(३) होय, अंशत: खरे आहे.

उघड्या कालव्याऐवजी बंदिस्त नलिका वितरण प्रणालीमुळे सिंचन आवर्तनाच्या वेळी होणारे पाणी गळतीचे प्रमाण कमी होते व पाणी चोरीला जाणे, उपसा करणे, कालव्याच्या नुकसान करण्याच्या घटना कमी होवून पाण्याचा अपव्यय टाळला जातो. याचा विचार करून मुख्य कालव्यांना अस्तरीकरण व बंदिस्त नलिका वितरण प्रणालीत रूपांतरण याकरीता जनाई शिरसाई उपसा सिंचन योजनेचा रू.८५८.०८ कोटीचा चतुर्थ सुप्रमा प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगतीत आहे.

तसेच उघड्या पारंपारीक कालव्याची कार्यक्षमता ५५ टक्के असून बंदिस्त नलिका वितरण प्रणाली केल्यास सुमारे ७० टक्के कार्यक्षमता वाढते.

(४) जनाई शिरसाई उपसा सिंचन योजनेच्या चतुर्थ सुप्रमाची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

वि.स. १८० (24)

## सातारा जिल्ह्यातील कोयना धरणाच्या डाव्या तीरावरचे ८० मेगावॅट जलविद्युत प्रकल्पाचे बांधकाम अपूर्ण असल्याबाबत

**(३७) ५८२४३ (३०-०४-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील कोयना धरणाच्या डाव्या तीरावर ८० मेगावॅट जलविद्युत प्रकल्पाच्या बांधकामासाठी माहे फेब्रुवारी २००४ मध्ये राज्य शासनाच्या जलसंपदा विभागाने रु. ३७९.७८ कोटी मंजूर केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जलविद्युत प्रकल्पाच्या वीज निर्मितीचा अंदाजित खर्च प्रती युनिट रु. २.४९ च्या अनुषंगाने प्रकल्पावर जास्त खर्च वाढला असल्याने जलविद्युत प्रकल्पाला सुधारित मान्यता मिळेपर्यंत सदरचे काम स्थगित ठेवण्याबाबत जलविद्युत प्रकल्पाचे मुख्य अभियंता यांनी निर्देश दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जलविद्युत प्रकल्पावर सुमारे रु. २५०.०३ कोटी खर्च करून देखील प्रशासकीय मान्यता अभावी हा प्रकल्प माहे ऑक्टोबर, २०२१ पासून प्रलंबित राहिला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जलविद्युत प्रकल्पाच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता देऊन सदर मंजूर करण्यात आलेले बांधकाम पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
मार्च २०१५ मध्ये सदर प्रकल्पावर मूळ प्रशासकीय मान्यतेच्या किंमतीपेक्षा अधिक खर्च होण्याची शक्यता असल्याने, सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त होईपर्यंत शासनावर अतिरिक्त आर्थिक दायित्व निर्माण होऊ नये म्हणून क्षेत्रिय मुख्य अभियंता यांनी प्रकल्पाची कामे संस्थगित ठेवण्याचे निर्देश दिले आहेत.
(३) अंशत: खरे आहे.
क्षेत्रिय कायालयांनी सन २०१८ मध्ये तयार केलेला सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्ताव अद्ययावत दरसूचीनुसार सुधारित करणे आवश्यक होते.तसेच प्रकल्प मूळ संकल्पनेनुसार उदंचन योजना म्हणून राबविण्यास महावितरण (ऊर्जा विभाग) यांची असहमती असल्याने, पुढील कार्यवाही प्रलंबित होती.
(४) मूळ प्रकल्प अहवालानुसार, सदर प्रकल्प उदंचन जलविद्युत प्रकल्प म्हणून संकल्पित आहे. दरम्यानच्या काळात ऊर्जा विभागाने (महावितरण) सदर प्रकल्प पारंपारिक जलविद्युत प्रकल्प म्हणून विकसित केल्यास वीजखरेदी करण्यास सहमती असल्याचे कळविले. तथापि,
१) उदंचन जलविद्युत योजनांचे महत्व विचारात घेता, सदर प्रकल्प मूळ नियोजनानुसार उदंचन जलविद्युत प्रकल्प म्हणून राबविणे.
२) तसेच सध्या अस्तित्वात असलेल्या कोयना धरण पायथा उजवा तट कालवा (२x२०मे.वॅ.)या प्रकल्पाचे Normative Life संपले असल्याने, प्रकल्पाचे नुतनीकरण व आधुनिकीकरण करणे .

या बाबींच्या अनुषंगाने उदंचन जलविद्युत प्रकल्पाचे विकसन तसेच Normative Life संपलेल्या जलविद्युत प्रकल्पाचे नुतनीकरण व आधुनिकीकरण करण्याबाबत शासन धोरण निश्चितीची कार्यवाही प्रगतीत आहे.
चालू दरसूचीने अंदाजपत्रक सुधारित करून कोयना डावा तीर धरण पायथा उदंचन जलविद्युत ( २ x४० मे. वॅ.) प्रकल्पास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याबाबतची कार्यवाही देखील प्रगतीपथावर आहे. तसेच सदर प्रकल्प विकसित करण्यासाठी महानिर्मिती कंपनीने इच्छुकता दर्शविली असल्याने,
महानिर्मिती कंपनी आणि जलसंपदा विभागांतर्गत महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्या संयुक्त विद्यम (SPV) ची स्थापना करुन प्रकल्प विकसित करण्याबाबतची कार्यवाही प्रगतीत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वाघोली (पुणे) येथील पोलीस ठाण्याच्या मंजूरीबाबत

**(३८) ५८३९५ (०३-०५-२०२३). ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाघोली (पुणे) या गावाचा मागील १ वर्षापर्वूी पुणे महानगरपालिकेमध्ये नव्याने समावेश झालेला असून या गावाची लोकसंख्या सुमारे ३ लाखांच्या आसपास असून कायदा व सुव्यस्थेच्या दृष्टीने नवीन पोलीस ठाणे होणेबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे पोलीस ठाणे कार्यान्वीत होणेबाबत शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०२३) :**(१) व (२) पोलीस आयुक्त, पुणे शहर व पोलीस अधीक्षक, पुणे ग्रा. यांचे आस्थापनेवर नव्याने एकत्रितपणे ७ पोलीस ठाणे निर्माण करणेबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर विचारधीन आहे. त्यामध्ये पोलीस ठाणे, वाघेली चे विभाजन करुन लोणीकंद पोलीस ठाणे निर्माण करणेबाबतच्या प्रस्तावाचा समावेश आहे. उक्त एकत्रित प्रस्ताव वित्त विभागास मान्यतेसाठी सादर करण्यात आले असता, त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने पोलीस महासंचालक कार्यालयाकडून दि. २१/०४/२०२३ च्या शासन पत्राव्दारे माहिती मागविण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात आदिवासी भागातील विकासासाठी असलेली ठक्करबाप्पा योजना मार्गदर्शक सूचना अभावी प्रलंबित असल्याबाबत

**(३९) ५८४९९ (३०-०४-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागाकडून आदिवासी गावांच्या विकासासाठी असलेली शासनाची ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजना मागील दोन वर्षापासून मार्गदर्शक सूचना अभावी प्रलंबित असल्याने अतिदुर्गम, जंगल डोंगराने व्याप्त, संवेदनशील आदिवासी बहूल गावांचा विकास होत नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी पाडयांवरील विकासकामे प्रलंबित असल्याने आदिवासी बांधवांमध्ये मोठया प्रमाणात असंतोष असल्याचे दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू योजनेच्या मार्गदर्शक सूचना तयार करण्यासाठी शासनाने गठीत केलेल्या समितीचा अहवाल प्राप्त झाला आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर योजना पुनश्च सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत?

**डॉ. विजयकुमार गावीत (०६-०७-२०२३) :** (१), (२), (३) (४) व (५) "ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा" ही योजना सन २०२१-२०२२ पासून राज्यस्तरावर वर्ग करण्यात आली आहे. सदर बाब विचारात घेऊन राज्यातील अनुसूचित जमाती घटकांच्या ग्रामीण भागातील वस्ती/गावांचा विकास करण्याबाबत सुचविण्यात येणाऱ्या कामांना शासन स्तरावरून मान्यता देऊन या योजनेतंर्गत घ्यावयाची कामे, अंमलबजावणी यंत्रणा व इतर निकष सुधारित करून "ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा योजनेच्या" सुधारित मार्गदर्शक सुचना सन २०२२-२३ या वर्षापासून अंमलात आणण्याचा प्रस्ताव आदिवासी विकास विभागाने मा. मंत्रिमंडळाच्या दि.२/११/२०२२ रोजीच्या बैठकीत सादर केला होता. सदर प्रस्तावावर विचार विनिमय करून मंत्रिमंडळास शिफारस करण्यासाठी मा. मंत्रिमंडळाने मंत्रिमंडळ उपसमिती गठित करण्याचा निर्णय घेतला.

त्यास अनुसरून शासन निर्णय दि. २८/११/२०२२ अन्वये मंत्रिमंडळ उप समितीचे गठण करण्यात आले. सदर समितीची बैठक दि.१०/१/२०२३ रोजी घेण्यात आली. सदर समितीने आदिवासी विकास विभागाने मा. मंत्रिमंडळाच्या दि.२/११/२०२२ रोजीच्या बैठकीत सादर केलेल्या प्रस्तावावर विचार विनिमय करून त्याबाबतचा सादर केलेला अहवाल दि.३१/१/२०२३ रोजी मा. मंत्रीमंडळ बैठकीत मा. मंत्रीमंडळाने स्विकृत केला असून त्याप्रमाणे ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजनेची सुधारित कार्यपध्दती व निकष शासन निर्णय दि.३/२/२०२३ अन्वये सुधारित करण्यात आले असून त्यानुसार योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

---

**जळगाव जिल्ह्यातील शेळगाव बॅरेज प्रकल्पात पूर्ण क्षमतेने पाणीसाठा करण्यात येणा-या अडचणी**

**(४०) ५८५०८ (३०-०४-२०२३). :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यातील शेळगाव बॅरेज प्रकल्पात पूर्ण क्षमतेने पाणीसाठा न करण्यात आल्यामुळे लाभार्थी शेतकऱ्यांना पाण्याची टंचाई जाणवत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पावर गेल्या २० वर्षांत कोट्यावधी रुपयांचा खर्च करूनही शाश्वत्व मुबलक पाणीसाठा होत नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पांमधील अडचणी कोणत्या आहेत व सदर अडचणी दूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०७-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

शेळगाव बॅरेज प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील उर्वरीत अतिरिक्त वनजमिन १४.४७ हे. संपादन करणे बाकी असल्यामुळे व प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रातील कडगाव-जोगलखेडा उंच पूलाचे काम प्रगतीपथावर असल्यामुळे प्रकल्पात पूर्ण क्षमतेने पाणीसाठा करण्यात आला नाही. तथापी लाभक्षेत्रातील शेतक-यांकडुन शेळगाव प्रकल्पावर पाण्याची कोणतीही मागणी करण्यात आलेली नाही.

(२) शेळगाव बॅरेज मध्यम प्रकल्पाच्या बॅरेजची कामे १००% पुर्ण झालेली आहे. प्रकल्पावर, मार्च २०२३ अखेर रु.९८३.०५ कोटी इतका खर्च झालेला आहे. वनजमिनीच्या १४.४७ हे. क्षेत्र संपादन करणेची प्रक्रिया पुर्ण झाल्यावर व बुडीत क्षेत्रातील पुलांची कामे पुर्ण झाल्यावर १००% पाणीसाठा करणे नियोजित आहे.

(३) धरणाचे काम पुर्ण झालेले असून धरणात पुर्ण क्षमतेने पाणी साठा करण्यातील अडचणी व केलेली कार्यवाही खालीलप्रमाणे आहे:-

१.बुडीत क्षेत्रामधील उर्वरीत अतिरिक्त वनजमीन १४.४७हे. संपादन करणे:- अतिरिक्त वनजमीनीचा (१४.४७ हे.) FCA १९८० अंतर्गत प्रस्ताव Online पध्दतीने दि. ०८.०२.२०२३ रोजी वनविभागाच्या संकेतस्थळावर सादर करण्यात आला असून सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने कार्यवाही प्रगतीत असून वनजमीन संपादन करण्याचे काम जून २०२३ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

२.बुडीत क्षेत्रातील कडगाव-जोगलखेडा उंच पूलाचे काम :- सदर पूलाचे काम ४०% पूर्ण झाले असून जूलै २०२३ अखेर काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंजनगाव सुर्जी आणि असदपूर (ता.अचालपूर) येथे बँकेने शेतक-यांचे बचत खाते थांबविल्याने शेतकरी अनेक अनुदानाच्या लाभापासून वंचित राहिल्याबाबत**

**(४१) ५८९८६ (१९-०४-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंजनगाव सुर्जी आणि असदपूर (ता.अचालपूर) येथे कोणत्याही बँकेमार्फत कर्जदार शेतकऱ्यांचे बचत खाते थांबवता येऊ नये असे शासनाचे आदेश तथा परिपत्रक असताना युनियन बँक ऑफ इंडिया शाखा कर्ज घेतलेल्या थकीत कर्जदार शेतकऱ्यांचे बचत खाते थांबविण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संबंधित बँकेमार्फत कर्जदार शेतकऱ्यांचे बचत खाते थांबविल्याने शेतकरी नापिकीची अनुदान, पीक विमा योजनेचे अनुदान, गॅस सिलिंडर सबसिडी, प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेच्या अनुदानांपासून वंचीत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हा अग्रणी बँकेच्या बैठकीत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी बँकेच्या अधिकाऱ्यास विचारणा केली असता त्यांच्याकडे माहिती नसल्याचेही दिनांक ४ जानेवारी, २०२३ रोजी व त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाच्या आदेशाचे उल्लंघन करुन शेतकऱ्यांना शासनाच्या विविध अनुदानांपासून वंचीत ठेवणाऱ्या बँकांवर कारवाई करण्याबाबत तसेच शेतकऱ्यांचे बचत खाते सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०६-२०२३) :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) नाही, हेही खरे नाही. कुठल्याही शेतकऱ्यांचे अनुदान थांबविलेले नाही, ते संबंधित लाभार्थ्यांना त्वरीत वितरीत करण्यात आलेले आहे.

(३) नाही, हे खरे नाही. जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०४ जानेवारी २०२३ रोजी संपन्न झालेल्या जिल्हा अग्रणी बँकेच्या बैठकीत कर्जदार शेतक-यांना शासनाकडून प्राप्त झालेले अनुदान बँकेमार्फत वळती होत असल्याबाबतचा मुद्दा स्थानिक लोकप्रतिनीधीमार्फत उपस्थित झाला असता जिल्हाधिकारी यांनी अशी कृती तात्काळ थांबविण्यात यावी अशा सूचना बँकांना दिल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधी अंतर्गत दर्यापूर (जि.अमरावती) मतदारसंघातील कामांना निधी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(४२) ५९००५ (०३-०५-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रधान मंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजने अंतर्गत जिल्ह्याच्या खनिज प्रतिष्ठान निधीमधुन खनिज बाधित क्षेत्राचा विकास व कल्याण करण्यासाठी विविध विकास कामांना निधी उपलब्ध होत असून दर्यापूर (जि.अमरावती) तालुक्यातील विविध विकास कामांना निधी उपलबध करून देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हा प्रशासनाकडे लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात रेती घाट असून जिल्ह्याचा खनिज प्रतिष्ठान निधी कोणत्या कामासाठी खर्च करण्यात येतो,

(३) असल्यास, जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधी अंतर्गत दर्यापूर मतदारसंघातील कामांना निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (०७-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) शासन निर्णय २१.११.२०२१ अन्वये जिल्हा खनिज प्रतिष्ठान अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या प्रधान मंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेकरिता मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार खनिज विकास निधी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष खाणबाधित क्षेत्राच्या विकासाकरिता उपलब्ध करून देण्यात येतो.

(३) जिल्हा खनिज प्रतिष्ठान, अमरावती अंतर्गत दि.०४/०५/२०२३ रोजी संपन्न झालेल्या नियामक परिषदेच्या बैठकीमध्ये दर्यापूर मतदारसंघातील प्रत्यक्ष खाणबाधित तीन व अप्रत्यक्ष खाणबाधित क्षेत्रातील एका कामास मंजुरी देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## डहाणू तालुक्यातील (जि. पालघर) धानिवरी दहिगाव येथील शाळेकरी विद्यार्थ्यांना नदीतून जीवघेणा प्रवास करावा लागत असल्याबाबत

**(४३) ५९६२३ (०२-०५-२०२३). श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू तालुक्यातील (जि. पालघर) धानिवरी दहिगाव येथील पानोथ आणि जांभी या दोन पाड्यांना मुख्य गावाला जोडणारा सुसरी नदीवर पूल नसल्याने या दोन्ही पाड्यांतील विद्यार्थांना शिक्षण घेण्यासाठी आपला जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पूल नसल्याने विद्यार्थ्यांना शाळेला जाण्यासाठी तसेच ग्रामस्थांना शेजारील गावात जाण्यासाठी रस्ता नसल्याने आपला जीव धोक्यात घालून नदीतील वाहत्या पाण्याच्या प्रवाहातून प्रवास करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी मागील अनेक वर्षांपासून या ठिकाणी पुलाची मागणी होत असतानाही शासनाकडून दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने सदर पूल त्वरीत बांधण्याबाबत तसेच विद्यार्थ्यांच्या व ग्रामस्थांच्या सोयी करीता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (११-०७-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) सदर पूल हा धानिवरी पानोदपाडा ग्रामा. ५४१ ता. डहाणू रस्त्यावर येत असून सा.क्र.०/६०० वर आहे. माहे मार्च, २०२३ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात "आवढाणी पानोदपाडा रस्त्यावर लहान पुलाचे बांधकाम करणे ता. डहाणू जि. पालघर" या कामास मंजूरी देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर पाटबंधारे मंडळाच्या अनुकंपा संवर्गातील कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी समायोजित करण्याबाबत

**(४४) ५९६५१ (०३-०५-२०२३). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जलसंपदा विभागांतर्गत कोल्हापूर पाटबंधारे मंडळाच्या अनुकंपा संवर्गातील लिपीक नि- टंकलेखक पदावरून कालवा निरिक्षक/मोजणीदार/दप्तर कारकून पदावर कायमस्वरुपी समायोजन करण्याची मागणी मंत्री जलसंपदा व सचिव, जलसंपदा विभाग यांचेकडे दि. २४ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे लोकप्रतिनिधी यांनी केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील उपरोक्त पदांकरीता समावेशाची प्रक्रिया राबविताना समान शैक्षणिक पात्रता व समान वेतन श्रेणी असल्याने राज्यशासनावर कोणताही आर्थिक भार येत नसताना देखील याबाबत कोणतीही कार्यवाही अद्यापपर्यंत विभागाकडून करण्यात आलेली नाही हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पदावर कायमस्वरुपी समायोजन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०२३) :** (१) मा.लोकप्रतिनिधींनी सचिव, जलसंपदा विभाग यांना उद्देशून, गट-क संवर्गातील कर्मचाऱ्यांचे लिपिक-टंकलेखक पदावरुन कालवा निरीक्षक/ मोजणीदार/ दप्तर कारकून पदावर कायमस्वरुपी समावेशनाबाबत विनंती केलेले दि.२४.८.२०२१ रोजीचे पत्र शासनास प्राप्त झाले आहे.
(२) व (३) कोल्हापूर पाटबंधारे मंडळ, कोल्हापूर यांच्या अधिनस्त लिपिक-टंकलेखक संवर्गातील ४ कर्मचाऱ्यांनी दप्तर कारकून व कालवा निरीक्षक या पदांवर समावेशन करण्याबाबत विनंती केली होती. त्यानुषंगाने, मंडळ कार्यालयाने दि.२१.७.२०२२ अन्वये प्रस्ताव शासनास पाठविला होता. दप्तर कारकून व कालवा निरीक्षक या पदांच्या सेवाप्रवेश नियमामध्ये लिपिक-टंकलेखक संवर्गातून समावेशनाची कोणतीही तरतूद नसल्याने, लिपिक-टंकलेखक संवर्गातून दप्तर कारकून व कालवा निरीक्षक पदी सामावून घेण्याची विनंती अमान्य करण्यात आली आहे. त्याबाबत शासनपत्र दि.११.८.२०२२ अन्वये मडंळ कार्यालयास कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासकीय आश्रमशाळा व वसतीगृहातील रोजंदारी कर्मचारी अनेक वर्षापासून अल्पमानधनात सेवा बजावत असल्याबाबत**

**(४५) ५९६७६ (०३-०५-२०२३). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अतिदुर्गम भागातील शासकीय आश्रमशाळा व वसतिगृहात आदिवासी विकास विभागाअंतर्गत वर्ग ३ व ४ चे रोजंदारी कर्मचारी अनेक वर्षापासून अल्पमानधनात सेवा करीत आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांचा आदिवासी विकास विभागाच्या दिनांक ३० एप्रिल २०१६ रोजीच्या परिपत्रकाप्रमाणे शासन सेवेत सामावून घेण्याबाबत वर्ग ३ व वर्ग ४ रोजंदारी कृती समिती यांच्या वतीने मा.मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री व मा.आदिवासी विकास मंत्री यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय, ,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने रोजंदारी कर्मचाऱ्यांना शासन सेवेत सामावून घेण्याबाबत कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (१२-०६-२०२३) :** (१) व (२) आदिवासी विकास विभागाच्या अधिपत्याखालील शासकीय आश्रमशाळा व वसतीगृहामध्ये वर्ग ३ व ४ मधील रोजंदारी कर्मचाऱ्यांना शासनमान्य दराने मानधन देण्यात येते. तसेच रोजंदारी कर्मचाऱ्यांना शासन सेवेत सामावून घेण्याबाबत काही निवेदने प्राप्त झाली आहेत.
(३) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय दिनांक ६ फेब्रुवारी, २०२३ अन्वये आदिवासी विकास विभागातील आश्रमशाळा/वसतीगृहातील सलग १० वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेल्या रोजंदारी/तासिका तत्वावरील कर्मचाऱ्यांना मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार शासन सेवेत नियमित करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला जिल्हयात महावितरणच्या नावाने बनावट मेसेज करुन ग्राहकांची फसवणूक करित असल्या बाबत**

**(४६) ५९८२१ (२७-०४-२०२३). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयात महावितरणच्या नावाने बनावट मेसेज करुन ग्राहकांची फसवणूक करीत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी अकोला जिल्हा पोलीस घटकामध्ये पोलीस ठाणे ,खदान येथे गुन्हा क्र.२०/२०२३ कलम ४२० भा.दं. वि. सहकलम ६६ (डी) आयटी ॲक्ट आणि पोलीस ठाणे, सिटी कोतवाली येथे गुन्हा क्र.२८/२०२३ कलम ४२० भां.द. वि. सहकलम ६६ (डी) आयटी ॲक्ट अन्वये गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. तसेच सदर प्रकरणातील गुन्ह्याचा तपास चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चेंबूर सुभाषनगर येथील म्हाडाच्या इमारत क्र.१८ व ३७ च्या विकासकाने इमारत क्र.३६ च्या जागेच्या नकाशात फेर-फार करुन सामाईक जागेवर अतिक्रमण केल्याबाबत**

**(४७) ५९८५७ (०३-०५-२०२३). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चेंबूर सुभाषनगर येथील म्हाडाच्या इमारत क्र.१८ व ३७ च्या विकासकाने इमारत क्र.३६ च्या जागेच्या नकाशात फेर-फार करुन सामाईक जागेवर अतिक्रमण केल्याबाबत स्थानिक नागरीकांसह लोकप्रतिनिधींनी निवासी कार्यकारी अभियंता, मुंबई गृहनिर्माण क्षेत्र विकास मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे यांच्याकडे दि. २४ नोव्हेंबर, २०२२ रोजी लेखी निवेदनाव्दारे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे, त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीअंती दोषी आढळून येणाऱ्या विकासकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) ते (४) चेंबूर येथील सुभाषनगर या म्हाडा वसाहतीमधील इमारत क्रमांक १८ व ३७ च्या संस्थांना म्हाडाने दि.१५.१०.२००९ व दि.१.५.२०११ अन्वये सीमांकन नकाशा मंजुर केला.

स्थानिक लोकप्रतिनिधी श्री. प्रकाश फातर्पेकर, वि.स.स. यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने म्हाडाच्या अधिका-यांनी संबंधित स्थळाची पाहणी केली असता, इमारत क्रमांक.३६ च्या बाजूची हद्द कायम केल्याचे आढळून आले आहे. तसेच याबाबत कोणतीही अनियमितता आढळून आलेली नाही. इमारत क्रमांक. १८ व ३७ च्या संस्थांनी सीमांकन नकाशानुसार हद्द कायम करून पुनर्विकासाचे काम केलेले आहे. सन्माननीय लोकप्रतिनिधींच्या तक्रारीस अनुलक्षून म्हाडाने केलेल्या तपासणीनुसार, सदर संस्थांनी सिमांकनानुसार हद्द कायम करुन पुनर्विकासाचे काम केलेले असल्यामुळे उक्त संस्थावर म्हाडा मार्फ़त कार्यवाही करण्याचा प्रश्न निर्माण झालेला नाही.

---

**नाशिक शहरातून २५ महिलांसह ३५ जण बेपत्ता झाले असल्याबाबत**

**(४८) ६००२० (२६-०४-२०२३). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील विविध भागातून विवाहित महिलांसह तरुणी बेपत्ता होण्याचे प्रमाणात वाढ झाली असून केवळ चार दिवसात १० तरुणांसह १४ विवाहित महिला बेपत्ता झाल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबधित दोषीवर कोणती कारवाई केली तसेच अपहरणाचे वाढते प्रमाण रोखून नाशिक शहरातील कायदा व सुव्यवस्था सुधारण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०६-२०२३) :** (१) नाशिक शहरात माहे जानेवारी २०२३ मध्ये बेपत्ता झालेल्या महिला व परुषांची माहिती खालील प्रमाणे:

| स्त्री, पुरुष | बेपत्ता | मिळालेले |
|---|---|---|
| विवाहित महिला | ६० | ४२ |
| तरुणी (अविवाहित) | ४१ | २९ |
| पुरुष | ४० | २२ |

(२) व (३) बेपत्ता झालेल्या व्यक्तींची चौकशी केली असता ते घरघुती वाद, किरकोळ भांडणे, तसेच प्रेम संबंधातून विवाह करण्याकरीता घर सोडून गेल्याचे आढळुन आले आहे.

बेपत्ता झालेल्या व्यक्तींची चौकशी करुन त्यांची याबाबत काही तक्रार असल्यास तक्रारीनुसार दोषींवर कायदेशीर कारवाई करण्यात येते.

कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी खालील प्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

i) शहरातील अपहरणाचे प्रमाण रोखण्यासाठी दिवस रात्र सतर्क पोलीस गस्त करण्यात येते.

ii) महिलांकरिता निर्भया पथकांची नेमणुक करुन गस्त करण्यात येते.

iii) अपहरणांच्या घटना घडू नयेत म्हणुन शाळा, महाविद्यालये, सोसायटी कॉर्नर इ.व्दारे तसेच सोशल मिडीया व्दारे जनजागृती करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खर्डा (ता.बाभुळगाव जि.यवतमाळ) येथील खर्डा लघुपाट बंधारे प्रकल्पाचे सुधारीत प्रशासकीय मान्यता व प्रकल्पाचे काम पुर्ण करण्याबाबत**

**(४९) ६०११४ (०३-०५-२०२३). डॉ.अशोक उईके (राळेगाव), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खर्डा (ता.बाभुळगाव, जि.यवतमाळ) परिसरात खर्डा गावाजवळील नाल्यावर प्रकल्पाचे बांधकाम सन २००९ पासून सुरु करण्यात येवून सदर कामास रुपये २९.१६ कोटींची प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती, सद्य:स्थितीत प्रकल्पाच्या कामाकरीता रुपये ३५.९३ कोटी खर्च झाला असून प्रकल्पाची घळभरणी वगळता मातीकाम पूर्ण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खर्डा प्रकल्पाचे काम सुरु असताना क्षेत्रीय परिस्थितीनुसार सुधारीत सर्वेक्षण करण्यात आले असल्याने त्यानुसार मौ.सरुळ गावाजवळील ३३ के.व्ही. विदयुत उपकेंद्र, उच्चदाब वाहिनी, वन जमीन बाधित होत आहे. मौ. सरुळ गावाचे पुनर्वसन करणे, गावाजवळील ३३ के.व्ही. विदयुत विदयुत उपकेंद्र स्थलांतरण करणे, उच्चदाब वाहिनी स्थलांतरण करणे, वन जमीन प्रस्तावास मान्यता मिळणे इ. बाबींचा अंतर्भाव केल्यामुळे तसेच अद्ययावत दरसूचीमुळे प्रकल्पाच्या सुधारीत किंमतीत वाढ होणार आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, खर्डा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्ताव रु.४४२.५० कोटी करिता तयार करण्यात आला असून राज्य तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक येथे छाननीअंतर्गत प्रस्तावित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन खर्डा प्रकल्पाचे काम पुर्ण करण्यास लागणारी सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०७-२०२३) :**(१) हे अंशत: खरे आहे.
सदर प्रकल्पावर मार्च २०२३ अखेर पर्यंत रु.३९.५० कोटी खर्च झालेला आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.
प्रकल्पाचा रु. ३६१.८४ कोटी किंमतीचा प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्ताव राज्य तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक येथे छाननीअंतर्गत आहे.
(४) राज्य तांत्रिक सल्लागार समितीच्या शिफारशीनंतर प्रकल्पाचा सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्ताव शासन स्तरावर प्राप्त झाल्यावर मान्यतेबाबत आवश्यक कार्यवाही शासन स्तरावर करणे नियोजित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्यात दिनदयाल उपाध्याय स्वयं शिष्यवृत्ती योजने अंतर्गत आदिवासी विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती मिळाली नसल्याबाबत**

**(५०) ६०२२८ (०३-०५-२०२३). डॉ.अशोक उईके (राळेगाव), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील आर्थिक दृष्टया गरीब आदिवासी विद्यार्थ्यांना दिनदयाल उपाध्याय स्वय योजने अंतर्गत शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जिल्हयातील बाबाजी दाते, लोकनायक बाबुजी अणे महाविद्यालयातील बी.ए.बी.कॉममध्ये शिकणा-या विद्यार्थ्यांना दिनदयाल उपाध्याय स्वय योजने अंतर्गत शिक्षणासाठी असलेली शिष्यवृत्ती अद्यापपर्यंत मिळाली नसल्याचे दिनांक १५ जानेवारी २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, केलेल्या चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानुषंगाने विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी तातडीने शिष्यवृत्ती मिळण्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे.
(४) नसल्यास, विलंबांची कारणे काय आहेत?

**डॉ. विजयकुमार गावीत (११-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) बाबजी दाते महाविद्यालयातील मंजूर एकूण १७२ अर्जापैकी १६७ विद्यार्थ्यांना स्वयंम योजनेचा लाभ वितरीत केला आहे उर्वरित ५ विद्यार्थ्यांना लाभ देणेबाकी आहे. तसेच लोकनायक बाबुजी अणे महाविद्यालयातील मंजुर एकुण २८ अर्जापैकी २६ विद्यार्थ्यांना निधी वितरीत करण्यात आले असून २ विद्यार्थ्यांना लाभ देणे बाकी आहे.
(३) उर्वरित ७ विद्यार्थ्यांना स्वयंम योजने अंतर्गत लाभ देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) निरंक

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.